# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त
## १९९४-९५

age no: 18



देखणी ती पाउले जी।
ध्यासपंथे चालती।
वाळवंटातून सुद्धा।
स्वस्तिपद्मे रेखिती।

# ‘स्व’-रूपवर्धिनी
# कार्यवृत्त १९९४ -९५

## अं त रं गा त


| | | | |
|---|---|---|---|
| ❊ | प्रस्तावना | | ३ |
| ❊ | माझं सुख माझं सुख हंड्या झुंबरं टांगलं ।<br>माझं दुःख माझं दुःख तळघरात कोंडलं ॥ | श्रीमती पुष्पाताई नडे | ४ |
| ❊ | जनांचा प्रवाहो | सौ. बागेश्री मंठाळकर | ६ |
| ❊ | अरुणाचलाच्या प्राचीवरून | कु. मनिषा बोईन / कु. प्रांजली लकडे | ८ |
| ❊ | असण्यातला अर्थ | श्रीमती वासंती यादव | ११ |
| ❊ | शाखावृत्ते / प्रकल्पवृत्ते | | १३ |
| ❊ | असे वक्ते अशी व्याख्याने | | १८ |
| ❊ | शिबिर वृत्ते | | १९ |
| | नागपूर शिबिरवृत्त व | श्री. संजय तांबट | |
| | अनुभव कथन | कु. तेजश्री शेंडे | २३ |
| ❊ | धन्यता अभियान | श्री. कृ. दा. जोशी | २५ |
| ❊ | असा एखादा ‘मी’ असावा’ | श्री. जयंत कवठेकर | २६ |
| ❊ | अभिनंदन | | २८ |
| ❊ | फिरती प्रयोग शाळा | श्री. संजय तांबट | २९ |
| ❊ | पुष्पाताईंना पत्र | | ३० |



*संपादक* : **सौ. बागेश्री विवेक पोंक्षे**

*मुद्रण* : **प्रबोध उद्योग, शुक्रवार पेठ, पुणे - २.**
**अभय मुद्रणालय - टिळक रोड - पुणे**

*रेखांकने* : **श्री. रवींद्र देव / श्री. अरुण फडणीस**

*मुखपृष्ठ* : **श्री. मिलिंद सबनीस / श्री. सचिन जोशी**

# ‘स्व’-रूपवर्धिनी

# कार्यवृत्त १९९४ -९५

## अं त रं गा त


| | | | |
|---|---|---|---|
| ❊ | प्रस्तावना | | ३ |
| ❊ | माझं सुख माझं सुख हंड्या झुंबरं टांगलं ।<br>माझं दुःख माझं दुःख तळघरात कोंडलं ।। | श्रीमती पुष्पाताई नडे | ४ |
| ❊ | जनांचा प्रवाहो | सौ. बागेश्री मंठाळकर | ६ |
| ❊ | अरुणाचलाच्या प्राचीवरून | कु. मनिषा बोईन / कु. प्रांजली लकडे | ८ |
| ❊ | असण्यातला अर्थ | श्रीमती वासंती यादव | ११ |
| ❊ | शाखावृत्ते / प्रकल्पवृत्ते | | १३ |
| ❊ | असे वक्ते अशी व्याख्याने | | १८ |
| ❊ | शिबिर वृत्ते | | १९ |
| | नागपूर शिबिरवृत्त व<br>अनुभव कथन | श्री. संजय तांबट<br>कु. तेजश्री शेंडे | २३ |
| ❊ | धन्यता अभियान | श्री. कृ. दा. जोशी | २५ |
| ❊ | असा एखादा ‘मी’ असावा’ | श्री. जयंत कवठेकर | २६ |
| ❊ | अभिनंदन | | २८ |
| ❊ | फिरती प्रयोग शाळा | श्री. संजय तांबट | २९ |
| ❊ | पुष्पाताईंना पत्र | | ३० |



*संपादक* : **सौ. बागेश्री विवेक पोंक्षे**

*मुद्रण* : **प्रबोध उद्योग, शुक्रवार पेठ, पुणे - २.**
**अभय मुद्रणालय - टिळक रोड - पुणे**

*रेखांकने* : **श्री. रवींद्र देव / श्री. अरुण फडणीस**

*मुखपृष्ठ* : **श्री. मिलिंद सबनीस / श्री. सचिन जोशी**

# 'स्व'- रूपवर्धिनी म्हणजेच . . . . .

☞ सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडविणारी संस्था

☞ व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्या यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी चळवळ

☞ आपुलकीने व जिव्हाळयाने मुलांचे प्रश्न हाताळणारी, सर्वांना 'आपली' वाटणारी संस्था

☞ विपरीत परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा

☞ राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा उद्याचा एक 'राष्ट्रीय प्रकल्प'

☞ परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखविणारी, आपुलकी निर्माण करणारी संस्था

अर्थात . . .

☞ ही पूर्ण वेळची शाळा नाही. विविध उपक्रमांद्वारे, वर्षभरात एकही दिवस सुट्टी न घेता राबविला जाणारा हा एक शिक्षण प्रकल्प!

***With Best Compliments From :***

**ADEPT RECORDING INSTRUMENTS (P) LTD,**

*Plot No. 4, S. No. 17/ 1 – B, Kothrud Industrial Estate,*

*Kothrud, Pune - 411 029. ☎ 331474, 341124, 340480*

# प्रस्तावना

'स्व'-रुपवर्धिनीचे कार्यवृत्त वर्धिनीच्या आप्तेष्टांपर्यंत पोचवायचे म्हणजे निरनिराळया प्रकल्पांमध्ये, निरनिराळया ठिकाणी, भिन्न वयांच्या, विविधरंगी आणि अनंत अनुभूतींच्या व्यक्तींनी एकमेकांशी वेळोवेळी साधलेल्या संवादांचे एक अनेकरंगी चित्र डोळयासमोर उभे करायचे.

एखाद्या शोभादर्शित्रातून पाहताना थोडासा जरी कोन बदलला तरी भराभर बदलत जाणारे रेषाकार जसे मनावर विविध आकृतींचा ठसा उमटवतात, तसे प्रत्येक व्यक्ती ही वेगवेगळया अविष्कारांचा ठसा उमटवत जाते. मग ती बालवाडीतील लहान गटात किलबिल करणारी छोटी पाकोळी किंवा शाखेत मातीशी मस्ती करत हुंदडणारी वासरे असतील: उद्याची स्वप्ने पाहण्याची ताकद असणारे युवक युवती यात आहेत, तर सर्व शाखा–प्रकल्पांमधून चालणारे काम जलदगतीने व मूळ कामाशी सुसंगत चालण्याकरता भान ठेवून काम करणारे शिक्षक–कार्यकर्ते पाय रोवून उभे आहेत.

"आधी केले मग सांगितले" उक्तीप्रमाणे काही पुढे निघून दूरवर पोहोचलेले. कोणी कामाच्या मस्तीत जगणारे, कोणी कामाकरता वेळ उपलब्ध करून देणारे,कोणी घामाचा दाम कामाकरता उपसणारे तर कोणी कल्पनांची देणगी देणारे, कोणी चित्रांची तर कोणी सुरांची,रंगांची साथ करणारे, कोणी डोंगरावरून मुलांना भटकायला नेणारे तर कोणी अनेक सुंदर पुस्तकांचा रंगीत पंखा मुलांसमोर उघडून बसलेले.काही पालक काही वर्धक, हितचिंतक आणि आप्त!

या सगळया सगळयांनी आपापल्या रंगरेषांमधून तयार केलेलं हे शोभादर्शित्रातील एक चित्र.

**कार्यवृत्त १९९४–१९९५**

With Best Compliments From :

**ASHA CONSTRUCTION COMPANY**

Surekha Apartments, Opp Octroi Naka,

Pune – Satara Road, Pune 411 009. Phones : 431112, 447116

# माझं सुख माझं सुख, हंड्याझुंबरं टांगलं माझं दुःख माझं दुःख तळघरात कोंडलं

श्रीमती पुष्पाताई नडे

तिने स्त्रियांची सुखदुःखे मुलायम हिरवळीवर बसून न्याहाळली नाहीत किंवा टिपली नाहीत तर त्यांच्या सुखदुःखात समरस होऊन क्षणभर त्या अनुभूतीने जीवन ती जगत आली आहे.त्यामुळे त्यांच्या सुखाने ती जशी सुखावली तसेच त्यांच्या दुःखाचे ओरखाडेही तिच्या मनःपटलावर कोरले गेले. स्त्रियांच्या अडचणी, दुःखे, त्यांच्या वेदना तिच्या हृदयास स्पर्शून त्यांनी तिला चिंतनशील बनवलंय. त्यामुळे स्त्रियांच्या कामातील अनुभव काय लिहावे हा प्रश्नच तिला पडत नाही. एक नाही,दोन नाही असे अनेक अनुभव तिला या कामात आले आहेत. कोणते लिहावे हाच फक्त प्रश्न.

तारेवरची कसरत करत करत हसतमुखाने संसारात रमणाऱ्या महिलांचे अनुभव सांगावेत की टांगती तलवार डोक्यावर असतानाही चेहऱ्यावर हास्य ठेवून सतत आपल्या मुलांच्या सुखदुःखांचा विचार करणाऱ्या महिलांची दुःखे सांगावीत. नियतीने स्त्रीची किती अवेहलना करावी? कधी तिला म्हटले जाते 'स्त्री ही क्षणाची पत्नी अन् अनंत काळची माता असते' म्हणून तिला अगदी उच्च पदावर नेऊन ठेवलंय. तर, कुठे 'तुझी जागा इथेच' 'पायातली वहाण पायातच ठेवावी', म्हणून तिची इतकी दीन अवस्था करून ठेवली आहे की मग असं वाटतं आपल्या समाजात अशा बुरसटलेल्या रुढी कधीच संपणार नाहीत का! यांचा अंत कधी होणार नाही का?

का होणार नाहीत? प्रयत्नांमुळे सर्व काही जमू शकतं असा विचार तिच्या मनात आला. कारण तिचे काम तेच होते. स्त्रियांचे काम करताना 'स्व'-रूपवर्धिनीचे उद्दिष्ट तिच्या डोळयांसमोर होतेच. महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करायचा...."अगं, तू काही समाजाला ओझे नाहीस. जशी तुला या समाजाची गरज आहे. तशी तुझीही गरज समाजाला आहे. चार भिंतीत राहिल्याने तुझे गुण तुला दिसले नाहीत." असे ती वेदनेने व्याकुळ झालेल्या, अडचणीत सापडलेल्या स्त्रियांना सांगते. अन् मग तिला एखाद्या होमनर्सिंग कोर्स करून गेलेल्या मुलींचे पत्र येई "खंरच मी आता माझ्या पायावर उभी आहे. तुमच्यामुळे माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला आहे. मला सध्या १२०० रू. पगार मिळतो. त्यामुळे माझे घरातील स्थानही आता उंचावले आहे. तुम्ही म्हणत होता ते खरं आहे. आपली सुद्धा गरज समाजाला असते." किंवा एखाद्या मुलीची सारखी पत्रं येतात, "ताई, तुम्ही माझे काम एकदा पाहून जा! तुम्ही आलात तर मला खूप आनंद होईल." ही खरंतर परीक्षेत नापास झालेली पण केवळ येथील वर्ग चालू असताना मधून मधून व्याख्यानं दिली जात किंवा महिलांशी गप्पा मारताना ती ते मन लावून ऐकत असे. तिच्या मनात सतत न्यूनगंड असे की आपल्याला काही येत नाही.तेव्हा तिला सतत सांगावे लागे. "अगं, अशी कोणतीच व्यक्ती नाही की जिला काही येत नाही. तू अभ्यासात कच्ची असशील, पण तुझा सेवाभाव जागृत ठेव. त्यातून तू पुढे जाशील." ही मुलगी आता एक खोली घेऊन आपल्या आईला सांभाळते आहे.



कित्येक स्त्रियांची तर तिला गंमत वाटते.नवऱ्याने टाकले म्हणून आपण आपल्या पायावर उभे रहावे.यासाठी जिवाचा आटापिटा करून या महिला होमनर्सिंगसारखा कोर्स करतात. अन् कुठूनतरी हा कोर्स उत्तमरीतीने केल्यावर त्यांच्या सुदैवाने त्यांना एखादे चांगले काम मिळते. अशावेळी त्यांच्या कुटुंबाला मग ती आपल्या जवळ हवी असते.

अगदी आपल्या कामाला अनुरूप अशा आमच्या एक शिक्षिका, स्वतःची चूल व्यवस्थित पेटते आहे. पण माझ्या आजूबाजूच्या महिलासुद्धा आपल्या संसारात सुखी असाव्यात असे वाटणाऱ्या या बाई! एक दिवस तिच्याकडे आल्या व म्हणाल्या,"ताई, मला वाटते आपण या शिवणवर्गातून बाहेर पडलेल्या महिलांसाठी काहीतरी व्यवसाय सुरू करू या. तुम्ही आम्हाला साथ द्या, आम्ही बाकी सर्व पाहतो."

हे ऐकून तिला आनंदही झाला.

पण, "अहो, तुम्हाला हे जमणार का? तुमची घरातली कामे, मुलांना शाळेत पोहोचविणे, शिवाय तुमच्या घरातील वातावरण, या सर्व गोष्टींचा विचार केलात का?"

"तुम्ही काळजी करू नका. आम्हा सर्व स्त्रियांना इथे आलो की खूप उत्साह वाटतो. खूप काहीतरी करावेसे वाटते. फक्त तुमची साथ हवी." दुसऱ्या दिवशी अकरा जणी जमा झाल्या. त्या प्रत्येकीने २०० रू.भांडवल घालून पेटीकोट शिवण्याचा व्यवसाय सुरू केला.

एक दिवस तिला बैठकीला येता आले नाही. उदास चेहरा! त्या उदास चेहऱ्यावरील ते केविलवाणे हास्य पाहून तिने विचारले,"का हो काय झाले? बरे वाटत नाही का?" "नाही हो! मी आज बैठकीला येऊ शकले नाही. तेच सांगायला आले. काय सांगू ताई, आता खरंच,सहन होत नाही. काल नवऱ्याने खूप मारले. वर आपणच कांगांवा करून मला व मुलांना चौकीत ठेवले. आता मी चौकीवरून येत आहे. मुलं घरी गेलीत. माझी वाट तुम्ही पाहू नका. हेच सांगायला आले होते. बैठक झाली का?" त्या बोलत होत्या,व ती सुन्न मनाने त्यांच्याकडे पहात होती. आपल्याच मनाशी विचारत होती. कुठून येते एवढी ताकद? एवढी सहनशीलता? ही....आईमध्येच असू शकते. मुलीच्या ओढीने ती ते सर्व करत असते. तिला आपली मुलं खूप मोठी करायची असतात ना!

वर्धिनीत मार्गदर्शनाकरिता येणाऱ्या एक जेष्ठ भगिनी एक दिवस म्हणाल्या,"आपण निटींगचा(स्वेटर विणण्याचा) वर्ग सुरू करू या. मला ती कला अवगत आहे. मी येऊन शिकवत जाईन. आपण निटींगची मशीन घेऊ या!" यावर ती म्हणाली "अहो वहिनी, तुम्हाला कसे जमेल? तुम्ही राहायला विठ्ठलवाडीला. शिवाय दोन लहान मुलं. त्यांची शाळा अन् तुमच्या घरचा व्यवसाय आहेच की. त्यातून रविवार हा एकच सुट्टीचा दिवस!" यावर त्या म्हणाल्या,"तुम्ही काही काळजी करू नका! मी दर रविवारी चार तास शिकवत जाईन." त्यांच्या आग्रहाखातर वर्ग सुरू केला. व म्हणता म्हणता त्यातील दोन महिलांनी स्वतःच मशिन घेऊन आपल्या घरात व्यवसाय सुरू केला.

आणखी ज्या अनुभवातून एका भगिनीला जावे लागले तो एक हृदयद्रावक प्रसंग म्हणावा लागेल. दुःख-दुःख म्हणून किती? त्याला सीमाच नाही. तिनेच साठविलेल्या पैशावर वडिलांनी तिचे लग्न लावून दिले. सुंदर स्वप्न उराशी बाळगून ही पुण्याला आपल्या सासरी आली. नवरा व्यसनी व सासरच्या लोकांची साथ नाही. सासरी छळ व माहेरी दारिद्र्य अशी अनेक स्त्रियांची अवस्था. माहेरच्या लोकांचीही साथ नाही. अशा मनाच्या भरकटलेल्या अवस्थेत असतानाच चालत्या ट्रेन मधून पडली व दोन पाय गमावून बसली. तिने ससूनमध्ये जाऊन सतत संपर्क केला. "जे झालं त्याचा विचार सोडून दे. परमेश्वराने तुला यातूनही जिवंत ठेवलं ना! मग नक्कीच तुझ्या हातून खूप चांगले काम होणार आहे. सुमन, तुझ्यासारख्या इतरांसाठी आता तुला जगता आलं पाहिजे."



सुमनच्या मनाची ताकद वाढविण्याचा हा प्रयत्न फळास आला. परवाच तिला तिचे पत्र आले.'ताई मला आता छोटे बूट मिळाले आहेत. मी आता हळूहळू चालते व एके ठिकाणी अपंगांच्या बरोबर नोकरी करते' हे वाचून मनोमन परमेश्वराला हात जोडले अन् ती म्हणाली, 'खरंच तू थोर आहेस.'


अशी अनंत अनुभवांची शिदोरी गोळा करत महिलांशी ती कधी समरस झाली हे तिलाच कळले नाही.

# जनांचा प्रवाहो

– सौ. बागेश्री मंठाळकर

**"जनांचा प्रवाहो इथे चाललेला।**
**सदा संस्कृतीच्या मुळापासूनी**
**पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या।**
**अम्ही भिन्न ना त्यांचियापासूनी**
**तयांच्या कळा जाणवाव्या अम्हाला।**
**तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा।"**

दररोज संध्याकाळी शाखेवर प्रार्थना म्हणताना मन जरा थबकतं आणि बंद डोळयासमोर उभी राहते, 'स्व'- रूपवर्धिनीच्या इमारती समोरील वस्ती–**"सदानंदनगर"**. जवळ जवळ अर्ध्याहून अधिक मुस्लिम समाज असलेली ही वस्ती. चार वर्षांपूर्वी हया ठिकाणी मुस्लिम महिलांकरिता मराठी प्रौढवर्ग सुरू झाला. हा वर्ग सुरू करणं म्हणजे एक आव्हानच होतं. घराच्याही बाहेर न पडणाऱ्या ह्या महिलांना शिकण्याकरता बाहेर काढणं एक कठीण काम होतं. या समाजाच्या प्रस्थापित विषयांमधे जखडलेल्या आणि त्यामुळे विकासाच्या वाटाच बंद झाल्या आहेत अशा महिला म्हणजे आमचं 'कार्यक्षेत्र'



सुरुवातीपासून ह्या वस्तीत शिकवायला जाणाऱ्या श्रीमती कबीर व सौ.शिंदे यांनी दररोज एकीकडे जाणे चालू ठेवले.एका महिलेकडे जायचे,शिकवायचे. मग पुढची महिला. असं करता करता आज चार वर्षांनी या महिला शिकण्याकरता बाहेर पडू लागल्या. एवढंच नाही तर आपल्या मुलींनाही शिकायला पाठवू लागल्या. वेळोवेळी होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात, सहलीत सहभागी होऊ लागल्या.

घरी गेल्यानंतर बाराखडी शिकवणं हाच एकमेव उद्देश या वर्गामागे नव्हता; तर शिकवता शिकवता 'क - क कमळाचा' म्हणताना तिच्याशी संवाद साधून तिच्या 'काळज्या' जाणून घेणं, 'ख - ख खटाऱ्याचा' म्हणता म्हणता घरचा 'खर्च' भागतो का? अडचण असेल तर काही मार्ग सुचवणं हेही या महिला करत. त्यांच्याशी गप्पा मारत मारत त्यांच्या मुलांना मांडीवर घेणं, त्यांच्या आरोग्याबद्दल, कुटुंबनियोजनाबद्दल माहिती देणं हे सुध्दा चालू होतं.

खरं तर घरातील काम, अडचणी, स्वतःचा व्याप सांभाळत या महिला काय शिकू शकणार? असं वाटू शकतं पण गेल्या चार वर्षांत हाताशी आलेलं यश पाहता या प्रकल्पाची आवश्यकता पटते. आज ह्या महिलांमधे शिक्षणाबद्दल जागरूकता निर्माण झाली आहे. आपण निरक्षर राहिल्याने आपल्याला आज पडेल ती कामं मिळेल त्या मोबदल्यात करावी लागतात. त्यामुळे आतातरी आपण शिकलं पाहिजे असं त्यांना वाटू लागलंय.

एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे त्यांची उद्यमशीलता व प्रचंड क्षमता. जवळजवळ सगळया महिला काही ना काही काम करत असतात. कुणी सुपारी फोडतं, कुणी पापड लाटतं, कुणी पोती शिवतं, कुणी उदबत्या वळतं. अभ्यास करता करताही त्यांचं हातानं काम चालूच असतं. दिवसाकाठी मिळणाऱ्या ५।६रुपयांत संसाराला आपण मीठ-मिरचीची तरी मदत केली पाहिजे ही भावना. सकाळपासून चरकाला बांधून घेतल्यासारखं काम चालू होतं. पाणी भरणं, धुणी धुणं,भांडी घासणं,स्वयंपाक करणं, मुलाचं आवरणं. एवढं करून त्या आपल्या कामाला बसतात त्या दुपारी कबीरताई किंवा शिंदे बाई गेल्यावरच उसंत घेतात.



आता अल्पबचतीबद्दलही त्यांच्या मनात जागरूकता निर्माण झाली आहे. आज मिळालेल्या पैशातून काही पैसे वाचविले तर उद्या अडचणीच्या वेळी ते कामाला

येतील हे त्यांना पटू लागले आहे.

संख्यात्मकदृष्टया बघायचं तर ५० महिला प्रौढ वर्गाला तर २५ मुली दुपारच्या वर्गाला येतात. अनेकजण विचारतात की काम करताना अडचण येत नाही का? पण अडचणींचा विचारही आमच्या मनात आला नाही. इतक्या सहजपणे या कुटुंबांमध्ये आम्ही मिसळून गेलो. घरातल्या कुठल्याही सुखदुःखाच्या प्रसंगात बाई किंवा ताईंना सहभागी करून घेतलं जातं. 'ताईऽऽऽ' म्हणून हाक मारत गळयात पडणाऱ्या मुलींबाबत सहजच एक जिव्हाळा निर्माण झाला आहे. त्यांच्या अडचणी ऐकल्या की वाटतं **'देवानं आपल्याला एका सुस्थितीतील घरात जन्म दिलाय पण त्यातच रमण्याचा अधिकार आपल्याला नाही.**

नुकताच घडलेला एक प्रसंग! वस्तीत एक म्हातारी बाई वारली. तिचे अंत्यसंस्कार करायला तिच्या घरात पैसे नव्हते, तर वस्तीतील महिलांनी ५।५ रुपये गोळा करून अंत्यस्काराला पैसे जमवून दिले. तेही प्रत्येकीने न कुरकुरता दिले.

जुलै महिन्यात एक मुलगा सिकंदराबादहून आपल्या घरून पळून आला होता. खरं तर त्याला कुणीतरी फूस लावून पळवून आणले होते. जेमतेम १५ वर्षांचा मुलगा! इथली भाषाही त्याला येत नव्हती. वस्तीतील एक महिला ही हैद्राबादची होती. तिला त्याची भाषा येत होती. तिच्याकडे येऊन खूप रडला. त्याला आईची आठवण येत होती. या बाईच्या घरात प्रत्यक्ष खूप हाल. नवरा सतत दवाखान्यात. त्यामुळे त्यांच्या सुपारी फोडण्यावरच घर चालतं पण त्यांनी स्वतः काही पैसे घातले. वस्तीभर फिरून घराघरातून रुपया, पाच रुपये गोळा केले. हैद्राबादचं तिकीट त्याला काढून दिलं. रात्रीचं जेवण बांधून दिलं आणि त्याला पाठवलं. हा मुलगा हिंदू होता आणि त्या बाई मुसलमान! पण त्या महिलेच्या मनात होती फक्त जिव्हाळयाची जात. मानव्याचा गहिवर. अशा वेगवेगळया प्रसंगांचे अनुभव नेहमीच आम्ही घेतो आणि इथे हे काम करण्याचा पीळ घट्ट होतो.

सहज मागे एकदा वाचलेल्या कवितेतल्या ओळी अशा वेळी आठवून जातात.

**मोडलेल्या माणसांचे दुःख ओले झेलताना ।**
**त्या अनाथांच्या उशाला दीप लावू झोपताना ॥**

## महिला विभागाद्वारे 'स्व'-रूपवर्धिनीत चालविले जाणारे विविध उपक्रम

| | | | |
|---|---|---|---|
| दु. १२ ते ४ | (१) **होमनर्सिंग** | – | सहा महिने. प्रमुख : श्रीमती कलबाग/सौ. मराठे. |
| दु. १ ते ३ | (२) **शिवण वर्ग** | – | सहा महिने. प्रमुख : श्रीमती गुरव |
| दर रविवार | (३) **निटींग वर्ग** | – | आजपर्यंत सतरा महिलांचे शिक्षण. दोघींनी स्वतःचे मशिन घेऊन व्यवसायास सुरुवात. |
| | (४) **उर्दू भाषिकांचे वर्ग** | – | चाळीस महिला व वीस मुली. दु. १.३० ते ५ पर्यंत तासा तासाचे वर्ग. |
| | (५) **कौटुंबिक सल्ला केंद्र** | – | दर शनिवारी दु. ३ ते ५ |
| | (६) **माता बाल संगोपन केंद्र** | – | दर बुध/शनि २ ते ४ वस्तीतील मुले –महिला मोफत तपासणी सरासरी पंचेचाळीस ते पन्नास रुग्ण. |
| | (७) **बालवाडी** | – | २४१ मुले, मोठा, छोटा मध्यमगट वयोगट २.३० ते ५ एकूण आठ-वर्ग व आठ शिक्षिका व तीन सहायिका |
| | (८) **बालशाखा** | – | ६५ संख्या शिक्षिका चार |



# अरुणाचलाच्या प्राचीवरून



कु. मनिषा बोईन / कु. प्रांजली लकडे

आदरणीय यशवंतराव,

सादर प्रणाम !

इकडे कार्यक्रम सुरू झालेत. परंतु काम फारसं नाही. काय करायचं आहे हे कळायलाच एक वर्ष जाईल असं वाटतंय.

गन्तव्यस्थान माहीत आहे, पण जायचं कसं हे आम्हालाच माहीत नाही. इथे अशोक कांबळे सर संघाचं काम करतात. त्यांना तेथील एका अधिकाऱ्याने 'तुम्ही स्वतःला हिंदू समजता, तर सांगा आज काय तिथी आहे?" असं विचारलं. उत्तरादाखल अर्थातच मौन. (आमचीही परिस्थिती) आज अशीच आहे.

कल्याणाश्रमाचं काम सांगताना आम्ही सांगतो की आम्हाला या वनवासींमध्ये त्यांची अस्मिता जागवायची आहे. परंतु आज माझी ओळख काय आहे? मी हिंदू आहे म्हणजे काय? याविषयी मनात स्पष्टता नाही. या संदर्भात सावरकरांच्या 'हिंदू' ची व्याख्या ढोबळमानाने सांगता येते. पण आमचे राष्ट्रप्रेम, यांचे दृश्य परिणाम काय याबद्दल तुटपुंजी माहिती आहे. ते सध्यातरी प्रत्यक्ष व्यवहारामध्ये नाही.

एकूण काय? तुम्ही जे सांगत असता की धर्म हा व्यवहार असतो. ते कर्मकांड नाही. याची खोली आता जाणवत आहे.

लॉयलिंयांग मध्ये संपर्क कसा करावा याबाबत अंदाज येत नाही. घरं एकमेकांपासून २-२ कि.मी. अंतरावर. घरातील सर्वच्या सर्व लोक सकाळी ६.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत शेतीसाठी कामात. भाषेचा प्रश्न, वस्तीगणिक भाषा वेगळी. लॉयलिंयांग व दानगट मध्ये अनुक्रमे दिगारो, मिश्मी, व मेसो मिश्मी. दोन्ही मिश्मीच पण भाषा पूर्णतः वेगळी.

सगळया भाषा अत्यंत सुंदर व नाजूक! उच्चारानुसार अर्थ बदलतो. संस्कृतपेक्षाही अधिक नाजूक वाटते. परंतु




आरोग्य शिबिर

भाषांना अजून लिपी नाही. तेजूमध्ये कॅल्सोम - कल्चरल अँड लिटररी सोसायटी ऑफ मिश्मी आहे. मिश्मीसाठी लिपी निश्चित करण्याचं काम चालू आहे. कॅल्सोमच्या काही लोकांना पूर्णतः स्वतंत्र, नवीन अशी लिपी शोधून काढावी असं वाटतं. तर काहींचं म्हणणं असं आहे की देवनागरी लिपी मध्ये काम सुरू करावं. एकीकडे नवीन लिपी शोधण्याचे प्रयत्न सुरू ठेवावेत. एक तर सरळच आहे की रोमन लिपी या भाषांसाठी कधीच पुरेशी पडणार नाही.

सध्या ८ आरोग्य शिबिरांमधून साधारणतः ३५० रुग्ण तपासले. तेजूमध्ये काही रुग्ण येतात. तेजूमध्ये लोकांमध्ये आयुर्वेदाबद्दल 'लाट' आहे. परंतु तेजूमध्ये आयुर्वेदिक औषधे मिळत नाहीत. त्यामुळे तिनसुखियाहून आणणार असतील तर लिहून देते व घरातील उपाय सांगते. अन्यथा ॲलोपॅथिक औषधे.

इथे नसांमधून इंजेक्शन देण्याची प्रचंडच हौस. आजच इथल्या एका सरांना मनाविरुद्ध सलाईन लावलं. खरं तर चुकलंच माझं. मी त्यांना माझं म्हणणं (केवळ वैतागून) पटवून देण्याचा प्रयत्न केला नाही. 'शिवाय मला आवश्यकता वाटत नाही. मी सलाईन लावणार नाही' असंही ठामपणे म्हटलेलं नाही. इथल्या दवाखान्यात तर

इंजेक्शन नसांतून देण्याची प्रथाच आहे. सध्या तरी आयुर्वेदाचा अभ्यास, त्यासंदर्भाने काही संशोधन. . . शून्य.

सध्या आम्ही तेजू म्हणजे जिल्ह्याच्या ठिकाणी आहोत. त्यामुळे जंगल दूर. गावातून गेल्यावर सर्व वेळ रुग्ण तपासण्यातच जातो. त्यामुळे अजूनतरी मुद्दाम वनस्पती पाहाणे वगैरेसाठी वेळ काढला नाही. अर्थात येता जाता डोळे उघडे ठेवून वावरलं तरी बरचसं होईल. तशी आता मनाला सवय लावायची आहे. तुमच्यासारखं अजून थोड्या प्रमाणातही जमत नाही. आणि असं जमवायचं हेच अजिबात लक्षात राहात नाही. काही गोष्टी उपजतच असतात का?

"बारम बू" हे तेजू मधील जिल्हा समितीचे मुख्य सल्लागार! खूपच छान, प्रभावी व्यक्तिमत्त्व! वर्णन करण्यापेक्षा व्हिडीओ कॅसेटवरच खरं तर तुम्ही त्यांना पाहायला हवं. त्यांनी हाताला कुठलासा दगडासारखा पदार्थ बांधला होता. एक दिवसापूर्वी विषारी माशी चावल्याने हात प्रचंड सुजला होता. हा पदार्थ विष शोषून घेतो. विष पूर्णतः शोषल्यावर आपोआप गळून पडतो. त्यानंतर तो पाण्यात थोडावेळ ठेवला तर त्यातून बुडबुडे बाहेर पडत होते. नंतर ते तो सिंदूरमध्ये (पाण्याचे संयुग) ठेवून देतात.म्हणजे पुनश्च वापरायला योग्य. हा पदार्थ म्हणजे विशिष्ट बेडकाच्या गळयातील माणिकासारखा भाग. हे सारं आजचंच चक्षुर्वैसत्यम्!

हा पदार्थ जहरामोहरा असावा काय? त्यांनी तो स्थानिक गारुड्यांकडून घेतला आहे. त्यांचा अनेकवेळा प्रयोगही केला आहे.

अशाच प्रकारे गावांतूनही अनेक कथा ऐकायला मिळतात. त्या त्या वेळी नाव, पत्ते लिहून घेते पण त्याचा पाठपुरावा अजूनतरी अजिबातच नाही.

आवागमनाची अत्यंत दुरावस्था. साधं तिनसुखिया -मध्ये (१०० कि.मी.) जायचं म्हटलं तरी नदी तीन वेळा पार करावी लागते. किमान दोन दिवस येण्याजाण्यास लागतात. त्यामुळेही केवळ नाव-पत्ते मिळून उपयोग नाही.

१५ ऑगस्ट- राष्ट्रीय सण म्हणजे काय याची प्रचीति इथे आल्यावर आली. स. ७.०० वा. आमच्या कार्यालयवजा दवाखान्यात झेंडावंदनाचा कार्यक्रम ठरवला होता. जास्तीत जास्त ४-५ उपस्थिती असण्याची अपेक्षा. पण प्रत्यक्षात मात्र सर्व समिती सदस्य सपत्निक हजर! आपल्या इथे कोणी महिला, कामाच्या वेळात, सक्तीचं नसतांना झेंडावंदनासाठी येण्याविषयीची कल्पनासुद्धा करणं अवघड. प्रत्येक घर, दुकानासमोर रांगोळी सजावटीसह ध्वजारोहण. संध्याकाळी बाजारामध्ये दिवाळीपेक्षाही अधिक झगमगाट संपूर्ण रस्त्याच्या कडेने दीप तेवत होते.

इथे तेजूमध्ये विवेकानंद केंद्राच्या मंदाताई व अपर्णाताई गेली १७ वर्षे काम करताहेत. त्यांच्याशी भेटून आल्यावर जाणवलं की काम अगदी रोमारोमात भरलंय. कामाशिवाय त्या कशाचा विचारच करू शकत नाहीत. मंदाताई ग्वाल्हेरच्या आहेत. अपर्णाताई अमरावतीच्या. केंद्रातर्फे योगासन वर्ग, ड्रॉईंगचे, शिवणाचे वर्ग, हस्तकला वगैरे, शिवाय संस्कार केंद्र अशा प्रकारचे कार्यक्रम इथे चालतात. चांगलं काम त्यांनी इथे उभं केलंय. सतत काही ना काही कार्यक्रम चाललेलेच असतात. त्यांच्या अनुभवांचाही आम्हाला आमच्या कामात उपयोग होईल.

इथे असताना एकदा ताफ्रागावच्या विवेकानंद केंद्राच्या शाळेत गेलो होतो. संध्याकाळी प्रार्थना चालू होती. एकत्रितपणे भक्तिगीत, देशभक्तिपर गीते आणि प्रार्थना असा कार्यक्रम असतो. नंतर कोणीतरी दोघेजण कोणत्यातरी चांगल्या विषयावर बोलतात. किंवा काहीतरी चांगलं वाचून दाखवतात. पण ५-१० मिनिटे उभं राहून सगळं इंग्लिशमध्ये सांगणं हे अनिवार्य असतं. एकूण सगळा तो कार्यक्रम पाहून फार छान वाटलं. एकत्रित म्हटलेल्या पद्यांचा प्रभाव खूप छान पडतो. त्यावेळचं वातावरण खूप छान होतं. प्रसन्न वाटले. मनात काही वेडेवाकडे विचार असतील तर निघून जातात. खरंच अनुभवलं मी.

आता आमच्या शेजारी राहाणारेही खूप चांगले आहेत. आदी जमातीचे आहेत. आंगू हे त्यांचं आडनाव. सध्या आमचा अजून पाण्याचा प्रश्न आहे. घरात वेगळे नळ नाहीत. अजून ते मिळेस्तोवर अजून वेळ जाईल सध्या पाण्याचा सर्व वापर त्यांच्या पाण्याचाच चाललाय. आणि तेही पाणी देताना फार कचकच नाही करत. त्यांच्यामुळेच सध्या आम्ही घरी राहू शकतोय. त्यांची मदत नसती तर

आमच्यासाठी मांजरीच्याही वर आठवं घर शोधावं लागलं असतं. (मांजर पिल्लांसाठी जशी सात घरं बदलते तशी आमची सात घरं बदलून झालेली आहेत.)

सध्या आमचा कामातला जो प्रमुख अडथळा आहे तो प्रवासाचा. गावं आहेत ती साधारण १५-२० किमी. लांब आहेत. घरापासून कार्यालयही ३ कि.मी. वर आहे. पण हा प्रश्न अजून साधारण एक महिना राहील. इथले श्री. सोताई क्री यांनी सप्टेंबर मध्ये स्कूटर द्यायचं कबूल केलंय.

काल आणि आज श्री. भास्कररावांबरोबरच चांगलं बोलणं झालं. त्यांचा स्टॅमिना जबर आहे. प्रत्येकाची ते तेवढ्याच आस्थेनं चौकशी करत होते. त्यांच्याशी बोलायला



**डावीकडून : सुब्रतो सेन, मनिषा, ममता, प्रांजली**
**मागे : वनिता, नाबा गोगोई लिंगी, अरुण, डॉ. प्राची, डॉ. भाटिया, नाबा जतन पुलू**

खूप बरं वाटतं. कसलंच टेन्शन नसतं. कोणताही विषय आम्ही मुक्तपणे त्यांच्यापुढे मांडू शकतो. आपल्या इथे शिबिरं ज्यासाठी आयोजित करतो (मनावरची धूळ साफ करायला आणि आपल्याला नक्की काय करायचंय? याची पुनः पुन्हा आठवण देणं आणि कामाला गती देणं.) तोच उद्देश भास्कररावांना भेटल्यावर पूर्ण होतो. मनावरचं मळभ दूर होतं. कामाची दिशा अजून स्पष्ट होते आणि कामासाठी नवा उत्साहही मिळतो. खूप बरं वाटलं त्याना भेटून. आणि त्यांचं बोलणंही मोठ्या माणसांसारखं खूप बोजड नाहीये. खूप बेसिक गोष्टी मांडतात.

माझ्याही गणिताच्या तासिका आता पुढच्या शनिवारपासून चालू होतील. **मला याची पूर्ण कल्पना आहे की तासिका घेणं हे त्या मुलांपर्यंत आणि पर्यायानं त्यांच्या घरापर्यंत पोहोचण्याचं एक माध्यम आहे.** आतापर्यंतच्या त्यांच्या शिक्षकांशी आणि गावातील इतर मंडळींशी चर्चा केल्यानंतर सध्या तरी हेच माध्यम योग्य वाटतंय. आता कुठेतरी सुरुवात व्हायलाच हवी आहे. आणि ती झाली. मुलं-मुली आल्या याचं मला खूप बरं वाटलं. आता जरा आमचं वेळापत्रक निश्चित होईल.

अधिक तपशील कार्यक्रम सुरळीत चालू झाल्यावर.
कळावे,
पत्रोत्तराच्या प्रतीक्षेत,

आपल्या नम्र,
**प्रांजली / मनिषा**

**" रोज सुबह उठता है और नमस्कार पढ़ता है ।"**



स्थळ - भीम नगर मधील वस्ती - जुबेर पीरजादे याचे घर - वेळ - दुपारची, संवाद चालला होता शिक्षक- पालक यांचा. आपला आजोळचा वर्धक जुबेर. याला सूर्य नमस्कारांचे विलक्षण वेड. त्याची आई कौतुकानं सांगत होती, 'सुबह जलदी उठता है और नमस्कार पढ़ता है'

# असण्यातला अर्थ

–श्रीमती वासंती यादव



असंख्य विचार मनात यायचे. डोकं भणाणून जायचं. फक्त विचार, विचार आणि विचार! सैरभैर अवस्थेतले! दिशाहीन ! स्वतःची सुखदुःखे कवटाळीत अलिप्तपणे मी जगत होते. दिवस यायचा आणि जायचा. मी मात्र माझ्या संकुचित जगात जगत होते. मनात प्रचंड अस्वस्थता होती.

घरातल्या लोकांना वाटायचे हिने बाहेर जावे. कुठलातरी क्लास लावावा. मनाला विरंगुळा म्हणून माझ्या शिक्षणाचा मी काहीतरी उपयोग करावा असे त्यांना वाटे. परंतु मला मात्र खूप भीती वाटायची. माझा आत्मविश्वास पूर्णपणे संपला होता. मी काहीही करू शकणार नाही अशी माझी खात्री झाली होती.

**घन तमी शुक्र बघ राज्य करी ।**
**रे खिन्न मना बघ जरा तरी ॥**

आयुष्याच्या अशा अवघड वळणावर असताना योगायोगाने मी सौ. चंद्राताई दलाया यांचे बोट धरून वर्धिनीत आले. काहीतरी काम मिळेल. मनाला विरंगुळा होईल या आशेने! मनातून घाबरले होते. तिथल्या लोकांनी माझी मुलाखत घेतली तर मला बोलता येईल ना? असे असंख्य प्रश्न मनात काहूर करत होते. परंतु सुरुवातीलाच वर्धिनीत पाऊल टाकले आणि मन प्रसन्न झाले. कार्यालयातील सर्व ज्येष्ठ कार्यकर्त्यांशी ओळख झाली. मला थोडीफार माहिती विचारून दुसऱ्या दिवसापासून वर्धिनीत बोलावले. मागचे सारे विसरून ज्या नव्या उमेदीने मी आज आयुष्याला सामोरी जात आहे त्याचे बीजारोपण त्याच दिवशी झाले.

**शोध स्वतःचा –**

दुसऱ्या दिवशी ग्रंथालयात येऊन बसले. पुस्तकांच्या सहवासात! परंतु वाचन फारसे झाले नाही. पंधरा दिवसांनी कार्यालयात काम करायला मला सांगितले. पत्र लिखाण, फायलिंग इ. मन लावून करू लागले. चूक व्हायचीच. जास्त भीती वाटत होती.

वर्धिनीचे ज्येष्ठ लेखापाल यांनी सरांना सांगितले की, 'मला एक कोणीतरी व्यक्ती द्या. तिला मी पूर्ण ताळेबंद शिकवीन' आणि माझी रवानगी त्यांच्या हाताखाली झाली. झालं. पुन्हा एकदा मनावरचा ताण वाढला. मला जमेल की नाही? पण सुरुवात मात्र झाली.

आता मी वर्धिनीत स्थिरावले होते. माझे काम करताना आजूबाजूला पाहात होते. ऐकत होते. एका उदात्त हेतूने सुरू केलेल्या या वर्धिनीत प्रत्येक मुलगा घडत होता. सरांचे बोलणे, गप्पा यातून खूप विषय ऐकायला मिळाले. कधी कधी त्यांच्यात सामीलही व्हायला लागले.

**परीसाच्या संगे . . .**

कुठलेही सामाजिक काम करायचे म्हणजे त्यासाठी संघटनाही चांगली असावी लागते. वर्धिनीतले कार्यकर्ते हे स्वतःचे काम सांभाळून वर्धिनीचे प्रत्येक काम करीत होते. मग ते कुठलेही असो. प्रत्येक जण कसा झपाटून काम करीत असतो. स्वतःला घडवत असताना आपण आपल्या समाजाचे, आपल्या देशाचेही देणे लागत असतो ही बांधिलकीची भावना मनात ठेवून वर्धिनीच्या वर्धक-वर्धिका घडताना जाणवत होत्या. स्वतःचा अभ्यास सांभाळून शाखेसाठी जीवाचं रान करणारे युवक-युवती

कार्यकर्ते यांच्याकडून मी खूप शिकले. प्रत्येक मुलाकडे होणारा शिक्षक, दादा, ताईंचा संपर्क; संपर्कातून सहवास व सहवासातून शिक्षण. एक मुलगा अथवा मुलगी फक्त वर्धिनीत येत नव्हते तर त्यांच्या माध्यमातून एक कुटुंब वर्धिनीला जोडले जायचे! त्यांचे सुखद:ख ते वर्धिनीचे सुखदु:ख! **मी माझ्या मनाचे कंगोरे घासत होते. माझ्या मनाची उंची या सर्वांच्या अनुभवातून नकळत वाढत होती. आकाशी झेप घे रे पाखरा!. . . .**

वर्धिनीतील लेखापाल पदाबरोबरच माझी जबाबदारी आता वाढली. वर्धिनीचा सर्व अर्थव्यवहार आता मी सांभाळत होते. मनात एक प्रामाणिकपणाची भावना होती. माझ्या हातून काही चूक घडू नये, असे वाटत होते. माझे मलाही कळले नाही की मी इतक्या समर्थपणे ही जबाबदारी कशी सांभाळू शकते? आता मला शाखेतही काम करावेसे वाटू लागले. मुलांना शिकविण्यासाठी नाही, खरं तर मीच शिकण्यासाठी आले होते.

**तुझे आहे तुझपाशी. . .**

आज वर्धिनीत येऊन मला ५ वर्षे झालीत. या काळात मी लिहायला शिकले, बोलायला शिकले, **गायलाही शिकले!** खऱ्या अर्थाने माझ्या 'स्व'-रूपाचे वर्धन झाले. माझा माझ्यावरही विश्वास बसत नाही इतका बदल माझ्यात घडून आला आहे. मी आज ज्या घट्टपणाने उभी आहे. त्यामागे खूप लोकांचे आशीर्वाद मला मिळाले आहेत. आणि त्यामुळेच एवढ्या आत्मविश्वासाने हे काम मी करीत आहे. मीही काही करू शकते याची जाणीव वर्धिनीने मला करून दिली. मी खऱ्या अर्थाने जगायला शिकले. मी वर्धिनीत ज्येष्ठ कार्यकर्त्यांपासून बाल वर्धकांपर्यंत अनेकांकडून अनेक गोष्टी शिकले. समर्पण, त्याग येथील कार्यकर्त्यांकडून शिकले. आता माझं जग खूप व्यापक झालंय. माझा परिवार वाढलाय. इथे येणारा प्रत्येक जण माझा आहे.

श्री. नाना कानिटकर, श्री. नाना जोशी, श्री. रा. प. देसाई यांच्यासारखे गुरू मला मिळाले. पुष्पाताईंसारखी जीवाभावाची सखी मिळाली. यांच्यामुळेच मी अधिक व्यापक स्वरूपात काम करण्यास सुरुवात केली. काम करताना चुकाही झाल्या. श्री. पटवर्धन सरांनी व सगळयांनी मला सांभाळून घेतले. धीर दिला. सरांविषयी लिहिणे म्हणजे समुद्रातील पाणी घेऊन समुद्रालाच अर्घ्य देण्यासारखे होईल.




**वर्धिनीने मला काय दिलं नाही? पंखात बळ दिलं, उडण्याचं सामर्थ्य दिलं, जे पंख मलूल होऊन पडले होते त्यात चैतन्य दिलं! आयुष्य असंही जगू शकते याचं भान दिलं.**

●●●

---

**वदतु संस्कृतम् ।**

भारत संस्कृत परिषदेच्या सहकार्याने यावर्षी आजोळ व बालशाखा यामध्ये एक महिन्याचे संस्कृत संभाषण वर्ग झाले. परिषदेचे कार्यकर्ते न चुकता अगदी वेळेवर उपस्थित राहात व अत्यंत खेळीमेळीने कथाकथनातून व प्रसंगांमधून रोजच्या आयुष्यात उपयुक्त होईल असे संस्कृत संभाषणाचे वर्ग घेत. संस्कृत भाषेतून स्वतःचा परिचय व संस्कृत भाषेशी जवळीक साधण्याचा हा प्रयत्न यशस्वी होतो आहे.

# शाखा वृत्त / प्रकल्पवृत्त

*अब्राहम लिंकनने हेडमास्तरांना लिहिलेले पत्र सर्वश्रुत आहे. आयुष्याच्या वळणांवरून जाताना आपल्या गोड छोकऱ्याने काय पाहावं, कसं कटुतेला व दुर्जनांना सामोरं जावं याविषयी सांगताना त्याला त्याचं बोट धरून शिक्षकांनी निसर्गाच्या, निर्भयतेच्या, भावनांच्या, कर्तव्याच्या आणि फोल ते टाळून सत्त्व ते उचलून घेण्याच्या विवेकाच्या प्रांतात कसं अलगद नेऊन ठेवावं हे अत्यंत सुरेखरीतीनं त्या पत्रात शब्दबद्ध झालंय !*

*वर्धिनीही आपल्या विद्यार्थ्यांनी काय पाहावं, काय करावं काय अनुभवावं हे ठरवते. व त्या त्या ठिकाणी वर्धकांना नेण्याचं काम करते. पुढचं काम वर्धकांनी करायचं असतं.*

*वर्धिनी ही वर्षातील सर्व दिवस अविश्रांतपणाने अथक प्रयत्नांनी तिच्याकडे आलेल्या 'त्या' बाल, किशोर युवक, शिक्षक, वर्धक मुलामुलींना फक्त आपलं बोट देते. त्यांनी अनेकानेक अनुभवांना सामोरं जावं, त्यांतील विविधता अनुभवावी व आपलं मन सदैव उत्सुक जागं ठेवावं असं वातावरण निर्माण करते. ते करण्यासाठी माध्यम निवडलंय शिक्षणाचं. सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार. त्याकरता तिला अनेक उपक्रम कार्यक्रम नियोजनपूर्वक राबवावे लागतात. त्यात आहेत खेळ, अभ्यास, चर्चा, गाणी- गप्पा गोष्टी व्याख्यानं, परिसंवाद, शिबिरं, प्रकल्प, उपक्रम, सहली, वाढदिवस मुलाखती, असे अनेकविध भरगच्च कार्यक्रम. त्यातील दैनंदिन कार्यक्रम वगळता या वर्षात काय घडलं ते पाहूयात निरनिराळ्या शाखांच्या कार्यवृत्तातून . . .*

---

### भगिनी निवेदिता शाखा

एक जून. निवेदिता शाखेचा वर्धापन दिन. छोट्या गटातील वर्धकांनी भारत - भारतीची विविध पुस्तके घरोघरी जाऊन विकली. यात दोन टोकांचे अनुभव त्यांना आले.एका घरात की, जे घर व जे बालक चांगल्या पुस्तकांपासून वंचित होते तेथे घरातील बाईंनी सांगितले, "तुम्ही इतकी छान पुस्तके आणली आहेत आणि तुमचा उद्देशही मला आवडला. परंतु हे पुस्तक घेण्याकरता लागणारे पैसे माझ्याकडे नाहीत. तरीही मी शेजारून पैसे उसने आणून हे पुस्तक घेणार आहे."

तर दुसऱ्या सधन घरातील पालकांनी, "हे काय आणले आहे? यापेक्षा नटनटींवरील पुस्तके आणलीत तर मी दहा पुस्तके विकत घेईन" असे ऐकवले.

'स्व' कमाईचा असा अपूर्व आनंद मिळवतानाच या मुलींनी मिळालेली रक्कम रु. २५१/- खानापूरच्या अनाथ लहान भावंडांच्या गुरुकुलाला देणगी म्हणून देऊन हा आनंद द्विगुणीत केला! गुरुकुलातील मुलांच्या सहवासात राहून या आनंदात अनेक पटींनी वाढ करून खऱ्या अर्थी वाढदिवस साजरा केला.




फासेपारधी समाजाच्या विस्कळीत जीवनाच्या समस्यांचा अभ्यास करून आपल्या परिस्थिती- ज्ञानात भर टाकण्यासाठी कु. लता टिळेकर, कु.वर्षा हुपरीकर, श्रीमती वासंती यादव मगरसांगवी येथे प्रत्यक्ष फासे-पारधींच्या वस्तीत जाऊन १५ दिवस राहिल्या. तसेच दिपाली पवार व तेजश्री शेंडे या नागपूरमधील फासेपारध्यांच्या धर्मांतराच्या कारणांचा अभ्यास करावयास जाऊन आल्या.

आपल्या बांधवांच्या समस्या जाणून हृदयाला हृदय जोडण्याचा हा छोटासा प्रयत्न. व मूळ प्रवाहात

त्यांना समाविष्ट करून घेण्याच्या प्रयत्नातला हा 'स्व'-रूपवर्धिनीचा खारीचा वाटा.

***वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी***

पर्यावरणाचे जे खरे संरक्षक 'वृक्ष' त्यांना राख्या




बांधून इ. ९ वीतील विद्यार्थिनींनी रक्षाबंधन साजरे केले.

***चुकता चुकता शिकता येते ।***
***प्रतिभेतून मग कला जन्मते***

यावर विश्वास होता भगिनी निवेदिता शाखेतील युवतींचा ! दरवर्षी गणेशोत्सवात आपले पथक असते. मग ढोल आणि ताशा वाजवायच्या वेळी हात आखडते कशाला घ्यायचे? पहिल्या वर्षी जमणार नाही. हळूहळू यायला लागेल या जिद्दीने यंदा मेहुणपुऱ्याच्या गणपतीसमोर तब्बल अडीच तास ढोलताशासह मुलींचे पथक नाचले. खऱ्या अर्थी तालासुरात !

**आजोळ**


'स्व'-रूपवर्धिनीच्या 'आजोळ'च्या वर्धकांमध्ये संवाद आणि परस्परांसंबंधीची जी वीण आवश्यक होती ती यावर्षीपासून थोडीशी जाणवायला लागलीय. ५ वी, ६ वी ७ वी तील आजोळचे वर्धक आता सर्व कार्यक्रम त्यांच्या गटनायकांच्या नेतृत्वातूनच ठरवताहेत. आणि एवढी एवढीशी मुले चक्क संपर्काच्या माध्यमातून एकमेकांविषयीची साद्यंत माहिती मिळवून शिक्षकांना चकित करून सोडताहेत. विशेषत: ७ वी तील मुले सर्व कार्यक्रमांतून व प्रसंगांमधून एकजूट घडवून आणताहेत. व हा सुंदर गोफ विणायला यंदाच्या वर्षी माजी विद्यार्थ्यांचा सहभागही जाणवतोय.

☆ १४ एप्रिल - श्री. बाबासाहेब आंबेडकर जयंती - या दिवशी संपूर्ण दिवसभर पाणपोई चालवून हजारो बांधवांना आजोळच्या विद्यार्थ्यांनी भर उन्हात गार पाणी दिले.

☆ एक छोटासा मुलगा. गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमाचे त्याने फारच सुंदर सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास मा. श्रीमती शीलाताई धायगुडे, अध्यक्षा, शिक्षण मंडळ पुणे म. न. पा. या प्रमुख पाहुण्या. त्यांनी पाठ थोपटून त्या बटूला आशीर्वाद दिले व आज छोटे छोटे दिसणारे वर्धक उद्या मोठे यश संपादतील असा विश्वास व्यक्त केला.

☆ क्रांतीकारकांच्या चरित्रांचा अभ्यास करताना मे महिन्यातील उन्हाळी शिबिरात आजोळच्या ५० विद्यार्थ्यांना ज्वलंत देशभक्तीचा संदेश सर्वच व्याख्यात्यांनी दिला. तसेच दिवाळीत हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेच्या आवारात भारतीय संस्कृतीवरील शिबिरात ५० विद्यार्थी मानचित्र परिचय, सांस्कृतिक प्रतिकांचा अर्थ समजावून घेण्यात रंगली होती.

**नागपंचमी** – आजोळचे एक पालक. घरची परिस्थिती बेताची. वडील एका लॉजमध्ये नोकरी करतात.




परंतु थकून भागून कामावरून आल्या-नंतर हे गृहस्थ वस्तीतील व स्वत:च्या मुलांना घेऊन नागपंचमीनिमित्त सर्पोद्यानास भेट द्यायला गेले. लाउडस्पीकर लावून जीपमधून सर्वत्र सर्पांबद्दल माहिती सांगत फिरणाऱ्या कार्यकर्त्यांना हा सुखद धक्काच असावा! नागपंचमीला सापांना दूध पाजून बेजार करणाऱ्या नागरिकांना या पालकांनी आपल्या कृतीतून चांगला धडा दिला.

**रामकृष्ण शाखा**

रामकृष्ण शाखेच्या वर्धक - युवकांना रोजच्या दैनंदिनीमध्ये अवांतर वाचनासंबंधीच्या नोंदी करावयास सांगितल्या होत्या. त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

तसेच नोंदवहीतील शेवटची २/३ वाक्ये इंग्रजीत असावीत असा आग्रह धरला आहे.

☆ नागपूरच्या धर्मान्तर प्रश्नाचा अभ्यास करून तेथे प्रत्यक्ष राहून, काम करून आल्यावर जे पाहिले, अनुभवले ते सर्व लोकांपर्यंत प्रभावी माध्यमाद्वारे पोहोचविण्याकरिता एक पथनाट्य सादर केले आहे.



**प्रेरणा शिबिर** – रायरेश्वराच्या परिसरात रावडी गावामध्ये ५वी ते ७ वी च्या एकूण १२० मुलांचे शिबिर झाले. रमणीय निसर्गाच्या सान्निध्यात मुलांनी ग्रामसंपर्क करून ग्रामीण जीवनाचा अनुभव घेतला.

**अखंडानंद शाखा**

**गुरुपौर्णिमा** – मुलांच्या कथाकथनाच्या स्पर्धा झाल्या व गुरुजनांच्या घरी जाऊन विद्यार्थ्यांनी त्यांना श्रीफल अर्पण केले.

गणेशोत्सवात झांज पथक हे अखिल बिबवेवाडी गणेश मित्र मंडळाला दिले तर शिवजयंतीला काही जणांनी गावातील मुलांचे ध्वजदलाचे पथक बसवून दिले.

**कथाकथन** – वर्षभर दर शनिवारी मुलांनी कथाकथन केले. यात मित्रांची पारख, सानेगुरुजी, चंद्र, तारे, शिवाजी महाराज इत्यादि विषयांवर कथा झाल्या.

**प्रजासत्ताक दिन** – सर्व शाखांच्या एकत्रीकरणाचा कार्यक्रम. मा. सौ. वसुधाताई मेहेंदळे यांच्या अस्खलीत ओघवत्या वाणीने "झांसीवाली" वर्धकांच्या डोळयासमोर सजीव केली.

सातवी च्या स्कॉलरशिपच्या परीक्षेला शाखेतील पाच मुले बसली. पैकी चार उत्तीर्ण झाली व **संदेश आंबेकर हा महाराष्ट्रात सतरावा आला.**

पंचशील चवतमहाल या वर्धकाला दुर्दैवी अपघाताने देवाज्ञा झाली. आम्ही सर्व त्याच्या कुटुबीयांच्या दु:खात सहभागी आहोत.

**बालशाखा/बालवाडी**

गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीस वळण लागावे म्हणून 'स्व'-रूपवर्धिनी शिस्तबद्ध पथकांची हजेरी लावते. यावर्षी बाल-शाखेतील ८/९ वर्षे वयाच्या बालचमूनेही टिपरी पथक उभे केले. त्यांच्यावरच्या विश्वासाची सार्थकताच त्यांनी अथकपणे शेवटपर्यंत शिस्तीने पथक उभारून सिद्ध केली.



ही मुले तुळशीबागेपासून लकडी पुलापर्यंतचे अंतर एकूण पाच तास उन्हात खेळत खेळत गेली.

☆ वर्धिनीतील बालवाडीत ज्यांची मुले आहेत ते पालक म्हणताहेत की, आजूबाजूच्या विपरीत परिस्थितीतही वर्धिनीने आम्हाला आधार दिला व आमचीही मने समाजाभिमुख करायला स्वत: प्रकाश दिला. तीन वर्षे या शाळेने आमच्या मुलांना चांगले वातावरण व संस्कार दिले, तेव्हा प्रेमाची भेट व कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून ६०० रुपये जमा करून बालवाडीसाठी पालकांनी वस्तू खरेदी केल्या. सर्व शिक्षिकांचा सत्कार पालकांनी केला. संपूर्ण कार्यक्रम पालकांनी स्वयंप्रेरणेने आयोजिला व पार पाडला.

**पालकांचे मनोगत**

*सौ. पातुरकर म्हणतात की, "मलाही पाठीवर दप्तर लावून शाळेत यायला आवडले असते."*

*सौ. बोकिल म्हणतात, "माझ्या मुलीला या बालवाडीत घालायची माझी तीव्र इच्छा होती म्हणून मी दुसऱ्या बालवाडीतून तिला इकडे दाखल केली."*

*सौ. बारणे या नगरसेविका आहेत. त्या म्हणतात, " प्रथम इतक्या घाण परिसरातील शाळेत मुलाला घालावे का असा प्रश्न पडला पण येथील अनुभव असा आहे की मला वाटते की आजूबाजूच्या सर्वांनी आपली मुले याच शाळेत घालावीत."*

" हम किसीसे कम नही"



नवीन मराठी शाळेतील बालशाखेचे शिबिर! स्वयंपाका-नंतर ही मोठ्ठाली भांडी आम्हीच घासणार म्हणून मुले हटून बसली. 'अरे, एवढी मोठ्ठी भांडी घासणं तुम्हाला जमणार नाही" असे समजावूनही स्वच्छतेचा गट माघार घेईना. शेवटी या छोट्या मंडळींनी त्यांच्याहून मोठ्या आकाराची पातेली मुळी पातेल्यात बसूनच "साफ" केली. जणू त्यांना म्हणायचं होतं. आम्हीही काही कमी नाही.

"रेल्वे प्लॅट फॉर्म"

पुणे स्टेशनला भेट द्यायला बालवाडीतील मुले गेली. रेल्वे बद्दलच्या कुतुहलाने व उत्सुकतेने त्यांनी अनेक प्रश्न स्टेशन मास्तरांना विचारले. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव पाहून त्यांना आत येण्याची परवानगी मिळाली. एवढेच नव्हे तर जेव्हा मुलांनी वर्धिनीची माहिती सांगितली तेव्हा अशा संस्थेला भेट देण्याची इच्छा असल्याचे स्टेशन मास्तर म्हणाले.

## सुबोधानंद शाखा

वर्धापन दिन नेहमीपेक्षा वेगळया पद्धतीने साजरा करायचे ठरवले व एका सुंदर पथनाट्याने आकार घेतला. पथनाट्यात मुलांनी 'स्व'-रूपवर्धिनी दाखवली. गणित, विज्ञान, इंग्रजी अशा विविध विषयांच्या अभ्यासाबरोबर देशभक्तीपर भावनांनी भरलेली व्याख्याने व शिबिरांसारखे कार्यक्रम वर्धिनीत होतात हे विद्यार्थ्यांनी पथनाट्यात मांडले.

क्रीडा व अभ्यास दोन्हींचा मेळ घालणाऱ्या गणेश सखाराम दळवी या आठवीतील वर्धकाची राज्यस्तरीय फुटबॉलसाठी निवड झाली.

दीपावलीच्या दुसऱ्या दिवशी वर्धकांनी घरून फराळाचे जिन्नस आणले. सर्वजण जवळच्याच कर्नाटकी बांधव काम करीत असलेल्या बांधकामस्थळी गेले. तेथील सर्व पुरुषगडी, बायाबापड्या, पोरे- सोरे व वर्धक यांनी कानडी- मराठी गाणी व गप्पा यांबरोबर फराळाचा समाचार घेतला.

सर्पोद्यानातील छोट्या अनाथ प्राण्यांच्या संगोपनासाठी साहाय्य करायचे या हेतूने निधीसंकलनाची मोहिम सुरू केली आहे.

## समर्थ रामदास शाखा

**केल्याने देशाटन** – 'अतिश वेळेकर, अजित नाईक, मकरंद साठे, संतोष कांबळे या युवकांनी अनुक्रमे नागपूरमधील फासेपारधी, औरंगाबादमधील डॉ. हेडगेवार रुग्णालय व यमगरवाडीतील फासेपारध्यांच्या गावी जाऊन त्यांचे मनोगत ऐकले व ते अनुभव शाळेतील मुलांना कथन केले.

***मन करा रे प्रसन्न सर्व सिध्दींचे कारण*** – तंदुरुस्त शरीराबरोबर प्रसन्न मनासाठी रामदासांनी मनाचेसुद्धा उद्‌बोधन केले. मनाचे वारु वठणीवार आणायला शाखाशाखांवर अनेक विषय मानसिक विकास बैठकीत हाताळले जातात. समर्थ शाखेवर यावर्षी रामदासांचे कार्य, संपर्क आदी विषय अभ्यासले. वर्षभर मुलांच्या मनात आदर, नम्रपणा, शिस्त, आज्ञाधारकता वाढावी याकरिता विशेष उदाहरणे दिली गेली तसेच राळेगण सिद्धी प्रकल्प. कै. नाना पालकर व मोरोपंत पिंगळे यांच्या कार्याची माहिती, जॉर्ज कार्व्हरचे चरित्र अशा अनेक विषयांना स्पर्श केला.

## उर्दु वर्ग (महिला व मुली)

सौ. सुलोचना शिंदे / श्रीमती सुगंधा कबीर / बागेश्री नगरकर

'स्व'-रूपवर्धिनीच्या समोरच्या वस्तीत चालणारा वर्ग. हा वर्ग दोन ठिकाणी चालतो. महिलांकरिता चालणारा वर्ग वस्तीत चालतो. सुमारे तीस महिला या वर्गाला येत असतात. एका ठराविक महिलेच्या घरी आसपासच्या काही महिला एकत्र येतात व त्या ठिकाणी मराठी शिकतात. वस्तीत असा तीन - चार ठिकाणी वर्ग चालतो.

उर्दू शाळेत जाणाऱ्या व मराठी न येणाऱ्या मुलींकरिता वर्धिनीच्या इमारतीमध्ये वर्ग चालतो. ह्या वर्गाची रचना दोन गटात केली आहे. इ. १ ली ते ४थी लहान गट व इ. ५ वी ते ८ वी मोठा गट. लहान गटात १० मुली आहेत. तसेच मोठ्या गटातही १० मुली आहेत. बरोबरीने ८/१० महिला थोड्या वेळाकरिता इथे येऊन बसतात. पण यामध्ये थोडी अनियमितता असते.

गेल्या महिन्यात या दोन्ही वर्गांचा मिळून भोंडला करण्यात आला. सुमारे पंचेचाळीस महिला व मुली भोंडल्यात सहभागी झाल्या होत्या.

केवळ अभ्यास घेणे हा या वर्गामागचा उद्देश नाही. वर्गात येणाऱ्या महिला व मुलींशी गप्पा मारून त्यांच्या घरातल्या समस्या जाणून घेणे, आवश्यकता असेल त्यांना वेळीच मदत करणे हेही उद्देश आहेत. वर्गाला महिला स्वतःचा रोजगाराचा हिशोब स्वतः करतात. रस्त्यावरील दुकानाच्या पाट्या, बसेसच्या पाट्या, दूरदर्शनवर येणारी वाक्ये इ. वाचायला लागल्या आहेत.

थोडक्यात मराठी शिकवता शिकवता अशा कुटुंबांचा संपर्क वाढवणं सहज शक्य झालं आहे. महिलांच्या वर्गाला येणाऱ्या महिलांना 'गरोदरपणात घ्यायची काळजी', 'मुलांचे आरोग्य' इत्यादि विषयांत त्यांना मार्गदर्शन केलं जातं. तसेच रोजगारासंदर्भातही माहिती दिली जाते.

*फूल फूल गुंफूनीच माळ होतसे।*
*थेंब थेंब झेलूनी झरा वाहतसे ।*
*'मोकळया मनी प्रेम फुलवूनी ।*
*माळा गुंफू या, या साखळी जोडू या*

**ही हिंदुभू परमश्रेष्ठ पदास न्याया ।**
**आम्ही कृती नित करू झिजवोनी काया ।**

नित्य काहीतरी कृती करून या हिंदूभू स तिचे वैभव परत प्राप्त करून देण्यास मदत करू असे म्हणून भगिनी निवेदिता शाखेतील दोन युवती वैद्य. मनिषा बोईन (B.A.M.S. B.A.) कु. प्रांजली लकडे (B.sc. ADC) या पूर्वांचलात वनवासी कल्याण आश्रमाच्या पूर्ण वेळ कार्यकर्त्या म्हणून कामास गेल्या आहेत. त्यांच्या कामाला शुभेच्छा व त्यांच्या पदव्युत्तर निर्णयाचे मनःपूर्वक अभिनंदन !

**" भारतातील सर्व लोक माझे बांधव आहेत म्हणून "**

*हे उद्‌गार आहेत ७-८ वर्षांच्या एका चिमुरडीचे. बालशाखेतील देविका जेव्हा के. ई. एम. रूग्णालयातील रूग्णांना राखी बांधायला गेली; तेव्हा तेथील एका रूग्णाने तिला विचारले, 'तू घरात भावाला राखी बांधून आली आहेस, मग अनोळखी लोकांना का राखी बांधतेस?' ती म्हणाली, 'घरातील भाऊ माझाच आहे. माझे प्रेम आहे त्याच्यावर त्याच प्रमाणे मी तुम्हाला राखी बांधतीय कारण भारतातील सर्व लोक माझे बांधव आहेत म्हणून !'*

*आम्हावरी खिळले डोळे उद्याच्या जगाचे।*
*आज स्वप्न बघतो आम्ही उद्याच्या दिसाचे*

# असे वक्ते - अशी व्याख्याने

| | | |
|---|---|---|
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | – | इस्रायल |
| श्री. महेंद्र सेठीया | – | अभ्यासाचे नियोजन |
| श्री. मोहन धारीया | – | पर्यावरण व मनुष्य |
| श्री. आनंद पाळंदे | – | गिर्यारोहण |
| श्री. ठिपसे | – | अंटार्क्टिका स्लाईड शो |
| श्री. नंदू फडके | – | आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांचे चरित्रकथन |
| श्री. राजाभाऊ लवळेकर | – | भारतीय संस्कृतीची प्रतीके |
| श्री. निरंजन घाटे | – | सांस्कृतिक प्रदूषण |
| श्री. मंदार परळीकर | – | जालियनवाला बाग हत्याकांड |
| श्री. दिवाकर पांडे | – | शिवराज्याभिषेक |
| श्री. हसबनीस | – | युध्दातील अनुभव |
| श्री. मिलिंद सबनीस | – | वंदेमातरम्‌चा इतिहास |
| सौ. नीलिमा गोखले | – | सावरकरांची विज्ञाननिष्ठा |

***With Best Compliments From :***

**M/S. ELECTROMARK ASSOCIATES**

42, Electronic Estate,
Pune-Satara Road, Pune - 411 009.

## शिबि

एकेकट्याने घेण्याच्या
मिळून घेण्याचे अनुभवही तित
शिबिरांमधून एकत्र आलेल्या
वातावरण, एकत्रित निवासाच
उद्देशाने केलेल्या कार्यक्रमांचा
तीव्रतेने परिणाम करते की शिबि
कामाचे अविभाज्य अंग झाली
यंदाच्या वर्षी शिबिर
आपण स्पर्श केला. ग्रामीण वातावरणातील रावडी येथील विद्यालयात भरलेले प्रेरणा शिबिर नावाप्रमाणेच रायरेश्वराच्या पठारावरील सहलीने प्रेरणादायी ठरले. खामंगावच्या श्रमशिबिरामध्ये मुलांनी भर उन्हात गावकऱ्यांसाठी बंधारे व शेततळी बांधून देऊन घामाची चव पाहिली. 'पर्यावरणा'चा अभ्यास असो की 'संरक्षणा'चा, विद्यार्थिनी बहुसंख्येने सहभागी झाल्या. नागपूरच्या बांधवांनी धर्मांतराची घोषणा करण्यामागची कारणमीमांसा, त्याचा तपशील जाणून घेण्याच्या उद्देशाने तेथे १५ दिवस निवास करून आलेल्या १० युवक व २ युवतींचे विलक्षण अनुभव, विस्कळीत जीवन जगणाऱ्या मगरसांगवीच्या फासेपारध्यांच्या जीवनाचा जवळून प्रत्यक्ष त्यांच्यातच राहून घेतलेला परिचय, मूर्तिकला आणि चित्रकलेत रममाण होऊन नवीन मराठी प्रशालेतील वृक्षांच्या सावल्यामधून एकत्रित राहिलेल्या बालशाखेतील छोट्यांचा चमू अशी कितीतरी एकाहून एक सरस शिबिरे........ शिबिर वृत्तातून........

**भगिनी निवेदिता शाखा :**

भगिनी निवेदिता शाखेच्या ४८ मुलींचे विद्यापीठातील शिशू विहार मध्ये ४ दिवसांचे शिबिर झाले. 'संरक्षण', शत्रूंपासून कोणते धोके संभवतात? भारताची तिन्ही सेना दलांमध्ये किती प्रगती झाली आहे? अशा विषयांची माहिती मुलींनी मिळवली. 'स्व'संरक्षणासाठी काय करायचे. तसेच स्काऊट/गाईड मधील अनेक तंत्रे त्या शिकल्या. प्रथमोपचाराबद्दल माहिती मिळविली व प्रात्यक्षिके केली.



दिवाळी शिबिर- दि- २९ ऑक्टो ते ५ नोव्हें पर्यावरणावर दुष्परिणाम करणाऱ्या घटकांचा परिचय तसेच हे प्रदुषण कसे टाळता येईल अशा विषयांवर चर्चा झाली. ४५ ते ५०
ा घेतला. सामाजिक कार्यकर्त्यांच्या जीवनाचा परिचय हा शिबिरात झाला.

**"आजोळ"-**

या वर्षी 'आजोळ'चे दिवाळी शिबिर हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेत झाले. 'भारतीय संस्कृती' या विषयावर चार दिवसांचे ५० मुलांचे हे शिबिर झाले. मानचित्र परिचय, संस्कृतमधून कथाकथन व संभाषण, वैदिक गणित, सांस्कृतिक प्रतीकांचा परिचय, भारतीय एकात्मता व गौरवशाली इतिहास या सर्वांचा लाभ शिबिरार्थींना झाला. तसेच मे महिन्यात क्रांतिकारकांच्या जीवनाचा परिचय करून देणारे शिबिर झाले. इतिहासाच्या कथा नुसत्या ऐकून न थांबता वर्तमानकाळाचे भान ठेवून आपण काय केले पाहिजे हे मुलांच्याच भाषेत विद्यार्थ्यांना अनेक वक्त्यांनी पटवून दिले. स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंह, अनंत कान्हेरे यांच्या त्याग, बलिदान व देशभक्तीच्या कथा तर मुलांनी ऐकल्याच परंतु,

**इतिहासाचे अवजड ओझे,**
**डोक्यावर घेऊन ना नाचा ।**
**करा पदस्थल त्याचे आणिक**
**चढून त्यावर भविष्य वाचा ।**

या पंक्तीचाही अर्थ त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी कथा, गप्पा, गाणी, गोष्टी इ. चे साहाय्य झाले.

**प्रेरणा शिबिर -**

भोर जवळ रावडी या गावी सरस्वती प्रतिष्ठानच्या क्रांतिवीर फडके विद्यालयात १२० मुलांचे प्रेरणा शिबिर झाले. हिरव्यागार डोंगराच्यामधे वसलेल्या या गावात मुलांनी ग्रामीण जीवनाचा अनुभव घेतला.जवळच्या पाच

गावांमध्ये ग्रामपंचायतीस भेट देऊन गावकऱ्याशी संवाद साधला.

हिरवळीवर मोकळया वातावरणामध्ये श्री. मिलींद सबनीसांनी घेतलेल्या चित्रकला स्पर्धांमध्ये मुले अक्षरशः रंगून गेली ! विविध स्पर्धा, खेळ यांच्या जोडीला शिवाजी महाराजांच्या जीवनातील थरारक अनुभवांनी त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. युवराज जव्हेरी यांचे गिरिभ्रमणातील अनुभव त्यांना वेगळयाच विश्वात घेऊन गेले. रायरेश्वराच्या पठारावरील सहलीने खरोखरंच शिबिराचे नाव सार्थक केले.

अशा अनेक शिबिरांमधून व सहलींमधून लाभतो तो एकमेकांच्या सहवास. हा सहवासच पुढे अनेक वर्षे शिदोरीसारखा उपयोगी पडतो.

**महिला शिबिर -**

" आपापल्या घरातील कामे करून शिबिरात उपस्थित राहण्याबद्दल महिलांना मर्यादा पडतात. त्यातून पूर्वभागात अडचणी जास्त. तरीही १४-१५ ऑगस्ट रोजी झालेल्या महिला शिबिरात ३५ महिला उपस्थित होत्या. आणि त्यांनी जे अनुभव ऐकले ते त्यांना प्रेरणादायी ठरले. कारण ते अनुभव होते ३० वर्षांपूर्वीच्या काळात एका महिलेने उपेक्षित अशा वेश्या वस्तीवर जाऊन त्यांच्यासाठी केलेल्या प्रचंड प्रयत्नांचे! तर काही अनुभव होते समाजातील अनन्वित, अत्याचार व अन्याय सहन करणाऱ्या त्यांच्याच भगिनींचे ! 'या शिबिरात मन सुन्न करून टाकणारे अनुभव ऐकले' असा अभिप्राय काही महिलांनी दिला तर काही 'यावर काहीच उपाय नाही का?' असा सवाल स्वतःलाच विचारू लागल्या.

❖ ❖ ❖

**कधी कुणाचे अश्रू पुसता बोटांनी हळूवार ।**
**हात होतसे वाद्य सुरांचे पाझरती झंकार**

'श्री - वत्स' मधील अनाथ मुलांसाठी खाऊ घेऊन गेलेले बालशाखेतील वर्धक. वय साधारण ६-७ वर्षे. मुलांबरोबर खेळताना त्यांना आनंद झाला. पण छोटा धन्नाप्पा चडचणकर म्हणाला, " यांना प्रेमाने लाडू - चिवडा कोण भरवत असेल? त्यांच्यावर प्रेम कोण करत असेल? आज प्रथमच मला वाटलं की 'आई-वडिल म्हणजे काय? ते आपल्याला काय व किती देतात.'

*With Best Compliments From :*

**GURUPRASAD TRANSPORT**

156 Mangalwar Peth, Parge Chowk,
Barne Road, Pune - 411 011. Phone - 627260

• All types of Transport Service • All over Maharashtra

# नागपूर अभ्यास शिबिर

**– श्री. संजय विष्णू तांबट**

**लोकसत्तातील पारधी समाजाच्या धर्मांतर घोषणेसंबंधीची बातमी व श्री. गिरीशराव प्रभुणे यांनी सांगितलेल्या अनुभवांमुळे काही तरूण खूप अस्वस्थ झाले. प्रत्यक्ष नागपूरमध्ये जाऊन व पारधी वस्त्यांमध्ये राहून स्थानिक कार्यकर्त्यांना काही मदत करावी. अशा भावनेतून या शिबिराची आखणी झाली. या शिबिरात दहा युवक व दोन युवती उपस्थित होत्या. त्यांच्या वतीने आपले अनुभव कथन करताहेत कु. *तेजश्री शेंडे* व सर्व परिस्थितीचा आढावा घेतलाय *श्री. संजय तांबट* यांनी.**

पारधी समाजाच्या प्रश्नासंबंधाने व प्रत्यक्ष घटनेसंबंधांने काही अभ्यास व शिबिराची पूर्वतयारी आवश्यक होती. त्यासाठी श्री.गिरीशराव, साप्ताहिक विवेक, बजरंगदलाची पुस्तिका व अन्य काही साहित्य यांचा खूप उपयोग झाला.

घटनेचं वृत्त प्रसिध्द होताच श्री. अण्णाजी उधोजी, श्री. संदीप गुर्जर, मोहन जावडेकर व अन्य कार्यकर्त्यांनी तातडीने या प्रश्नात लक्ष घातले. हे सर्वात महत्त्वाचे आहे. बातमी वाचून अस्वस्थ होणारे अनेक असतात. परंतु प्रश्नाला थेट जाऊन भिडणारे, त्यांच्या सोडवणूकीसाठी पाठपुरावा करणारे अगदी कमी.Break the ice. बर्फ फोडण्याचे अवघड काम त्यांनी केले. हे बदलत्या, जागृत हिंदू मानसिकतेचे लक्षण आहे. पुण्यातील कार्यकर्त्यांची मदत हा या योजनेतील एक छोटा भाग आहे.

परंतु या सुखद पार्श्वभूमीलाही खेदाची काळी चौकट आहे. काही कार्यकर्ते या प्रश्नासाठी जीवाचे रान करीत असताना अन्य क्षेत्रातले सर्वसामान्य व काही जेष्ठ कार्यकर्ते यांची या संबंधाने उपेक्षा, अज्ञानच जाणवले. दि. ३ फेब्रुवारीला काय घटना घडली? असे विचारणारेही अनेक भेटले. त्यामुळे या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आवश्यक असणारे वातावरण, जनमताचा रेटा सातत्याच्या संपर्काची साखळी हे अभावाने दिसले. असे असले तरी जे प्रयत्न झाले त्यांचे महत्त्व थोडेही कमी होत नाही.

नागपूरला प्रत्यक्ष पारधी वस्त्यांमध्ये जाऊन राहण्याचा, त्यांच्यामध्ये मिसळण्याचा उद्देश डोळयासमोर होता. सर्वेक्षण हे केवळ निमित्त होतं. संपर्क साधण्याचं व प्रश्न समजून घेण्याचं. त्यादृष्टीने तयार केलेली प्रश्नावली Indicative या स्वरूपाची होती. अर्थात या ठिकाणी एका मर्यादेचा उल्लेख करायला हवा की, प्रत्यक्ष योजना किंवा कार्यक्रमांवर आधारीत असं सर्वेक्षण आवश्यक आहे. व ते शासकीय यंत्रणेमार्फत चांगल्या पद्धतीने होऊ शकतं. त्यासाठी शासकीय कार्यकर्त्यांना मात्र या समाजाबद्दल आपुलकी, प्रश्न सोडविण्याची कळकळ हवी. स्वयंसेवी संस्थेमार्फत समाजाच्या प्रश्नांची जाण असलेल्या कार्यकत्यांना योग्य प्रशिक्षण देऊन अशा पद्धतीचं सर्वेक्षण घेता येऊ शकतं. शासनाची त्यासाठी आर्थिक मदतही घेता येईल.

आर्थिक गरजा प्राधान्याने सोडविण्याबरोबरच बदलत्या काळाबरोबर सामाजिक रूढी, रीती शिक्षणाच्या माध्यमातून बदलण्याला सुरुवात व्हायला हवी. ती- समाजातून पुढे आलेल्या नेतृत्वातूनच होऊ शकेल.

या समाजाच्या नेतृत्वाबाबत थोडा सावध विचार करणे आवश्यक आहे. एक तर गटागटांमध्ये काही भांडणे किंवा अंतर्विरोध आहेत. वस्त्यांमध्ये हिंडताना काही सिमेंट विटांची पक्की घरं(एक-दोन) व बाकी सर्व झोपड्याच दिसतात. समाजातच दोन वेगळे स्तर स्पष्ट दिसतात. एक पूर्णपणे अज्ञानी, दरिद्री.-दुसरा थोडी जाण असलेला व त्यातून स्वतःचे नेतेपण मिरवत स्वार्थ साधून घेणारा. त्यामुळे प्रत्यक्ष खालच्या घटकांपर्यंत संपर्क साधून त्यांची राहाणी बदलली तरच कायमस्वरूपी तोडगा

निघू शकेल.

सगळंच चित्र निराशाजनक नाही. शिक्षणाच्या व मुलांच्या माध्यमातून प्रयत्न केल्यास स्थितीत चारपाच वर्षात लक्षणीय बदल घडू शकतो.दुसऱ्या फळीतलं नेतृत्व यातून निश्चितपणे उभं राहू शकतं. चंद्रशेखर राजपूत, बबन गोरामण, देशकर पवार, मोहन पवार, अशी अनेक नावं सांगता येतील.

संघमंत्राप्रमाणे मुलांच्या माध्यमातून घरात प्रवेश, नंतर परिवर्तन असे करता येईल; असा आठ दिवसातला अनुभव सांगतो. त्यामुळे देवलापार वसतिगृहात काही निवडक विद्यार्थी नेणं, सर्व मुलांच्या शाळेच्या प्रवेशातील अडचणी दूर करणं, दैनंदिन नाही तरी साप्ताहिक शाखा व अन्य कार्यक्रम, ग्रंथालय (मुलांना चांगली गोष्टींची पुस्तकं वाचायला देणं, वाचून दाखविणं), आरोग्य केंद्र, फिरता दवाखाना. अशा अनंत उपक्रमांच्या साखळीतून हे घडविता येईल. श्री. सनतकुमार गुप्ता किंवा अन्य पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली हे सर्व होऊ शकतं. सध्या कामात नसलेल्या कार्यकर्त्यांनाही या निमित्ताने कामात आणता येऊ शकेल.

प्रत्यक्ष वस्त्यांमध्ये आठ दिवस राहिल्यानं संपर्कातून खूप चांगलं वातावरण उभं राहिलं. सौ. देवकाबाई शिंदे, समीर शिंदे, गिरीशजी यांच्या भेटीचा व बोलण्याचा परिणाम आपल्या शंभर कार्यक्रमांएवढा आहे. अशा कार्यकर्त्यांची प्रवासाची योजना आपल्या कामाला उपकारक आहे. ते सर्वात प्रभावी माध्यम आहे.

हे जनजागरण अभियान आपण चालवलं, ते धर्मांतर करण्याच्या घोषणेने आपण खडबडून जागे झालो म्हणून. घोषणा न करता धर्मांतर झालं असतं तर हिंदू समाजाचं खूप मोठं नुकसान झालं असतं. त्यामुळं धर्मांतर घोषणा ही एखाद्या Catalic Agent सारखी काम करती झाली. सुदैवाने आपल्या सर्व समाजाच्या प्रयत्नांमधून धर्मांतर आपण टाळू शकलो याचा निश्चितच आनंद आहे. नागपूरला येताना आपल्या प्रयत्नांतून किमान काही बांधवांचे धर्मांतर रोखू शकलो तर हिंदू समाजाचे त्यात हित आहे, अशी भावना होती. बाकी सर्व गोष्टी बाजूला ठेवून प्राथमिकतेने याकडे पाहण्याची निकड जाणवली; ती आपल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून विषय वेळेवर पोचू शकला यामुळे. धर्मांतर टळल्यामुळे आपण खूपच आनंदी आहोत. परंतु या सर्व प्रकरणातून आलेली जाग तात्पुरती ठरू नये, ही ईश्वरचरणी प्रार्थना. परंतु त्यात सुध्दा कर्माचे अधिष्ठान हवे.

नागपूर काय किंवा पुणे काय संपूर्ण भारतभर अशा पद्धतीचे प्रश्न आहेत; वस्त्या आहेत. कदाचित यातून सुध्दा काही व्यक्तिगत स्वार्थापोटी, लाभापोटी अशा पद्धतीच्या घोषणा होण्याचा धोका असू शकतो. त्यासाठी किमान जागे राहिलेल्यांनी अशा वस्त्या व त्यांच्या प्रश्नांचा सखोल अभ्यास करून त्यासाठी प्रयत्न करायला हवेत! संघ आणि अन्य क्षेत्रातील सर्वांच्या संवेदना कायम त्यासाठी सतर्क हव्यात. कारण आता अपेक्षा खूप वाढल्या आहेत. **"तुम्ही दहा वर्षांपूर्वी आम्हाला भेटला असता तर पारधी समाजाचं चित्र खूप बदललं असतं आणि दुर्दैवी वेळ आली नसती." हे श्री. कृष्णराव चव्हाण यांचे उद्गार** आपण सूचकतेने घ्यायला हवेत. यापुढे कोणत्याही समाजगटांना असे विधान करण्याची वेळ येऊ नये, असे वातावरण व काम उभे करण्याची आपली सर्वांची जबाबदारी आहे. त्यादृष्टीने आपण कामाला लागूयात.

***With Best Compliments From :***

**BRITE ELECTROPLATERS**

Tophkhana, Shivajinagar,
Pune - 411 005.

## नागपूर – एक अनुभव कथन

**– कु. तेजश्री शेंडे**

नागपूरमध्ये पारधी वस्त्या ७-८ ठिकाणी विखुरलेल्या असल्याने प्रत्येक वस्तीत दोघेजण याप्रमाणे गट पाडले. एकीकडे आपण वस्तीत राहणार हा आनंद आणि दुसरीकडे एकटे रहायचे म्हणजे जरा भीती वाटत होती.

निशिकांत, आतिष व मला वस्तीमध्ये सोडण्यासाठी संजयदा व संघातील कार्यकर्ते आले होते. आल्यावर तेथील सगळ्या लोकांनी आमच्यावरती शब्दांचा भडिमार सुरू केला. शेवटी संजयदा व प्रभुणेसरांनी आम्ही इथे राहून मुलांचे खेळ, गाणी घेणार आहोत असे सांगितल्यावर ते थोडे शांत झाले. थोड्या वेळाने एक-दोन जण चिडून म्हणाले की "आम्ही मुसलमान होणार म्हणून हिंदू लोक आता जागे झाले. आमच्या वस्तीवर येऊ लागले यापूर्वी आमच्याकडे कोणी पाहत नव्हते. आम्ही हिंदू धर्माचे नाही आणि असतो तर या लोकांनी आम्हाला सामावून घेतलं असतं. आमच्यावरील अत्याचार, अन्याय यांनी सहन केले नसते. पण याच लोकांनी आम्हाला वाळीत टाकलं.
हिंदू पोलीस रात्री अपरात्री वस्तीवर ह
अब्रू लुटतात. अशी छळवणूक हे लो
मुसलमान धर्म स्वीकारणार" शे
निवळल्यावर आम्ही कशासाठी आल
सुरुवात केली.

वस्तीमध्ये पाऊल टाकता
आला. जसे आपण घराच्या समोरचे
तिथे प्रत्येक घराच्या समोर दारूच्या
प्रत्येकजण आपल्या भट्टीवर पोटाची
भट्ट्यांची सर्व कामे स्त्रिया करतात.
फक्त दारू पिण्याइतकाच संबध आ

पहिल्या दिवशी परत सं
असता तेथील वातावरण पाहून आ
अस्वस्थ झाले. तेथे सगळ्या स्त्रिया र
धक्का बसला. तशाच वातावरणात मुलामुलाच खळ घण्यासाठी पुढे गेले तर एका माणसाने दारूचा पेला सरबत म्हणून मला दिला. दारू पिण्याच्या या आग्रहातून सुटता सुटता माझी अक्षरशः भीतीने गाळणच उडाली.

तेथील बंधुभगिनींशी जवळीक निर्माण करण्यासाठी लहान मुलांच्या माध्यमातून जायला सुरुवात केली. मुलांशी गप्पा मारत असताना त्यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला. हे सगळं करत असताना एक प्रकर्षानं जाणवलं की, ही मुलं हुशार, चुणचुणीत, जिद्दी, व खूप धाडसी आहेत. काही मुलांमध्ये प्रतिभाशक्ती थोड्या प्रमाणात आहे. आम्ही गाणी शिकवत असताना राजेंद्रने तिथल्या तिथे गाण्याची दोन कडवी तयार केली. खरंच या मुलांना आतापासून योग्य दिशा मिळायला हवी. नाहीतर मोठी झाल्यावर बाहेरची आकर्षणे त्यांना आपल्याकडून खेचून घेतील.

मुलांशी गप्पा मारताना, खेळताना प्रत्येकात काही ना काही तरी वैशिष्ट्य आढळायचं. सूरज हा यंदा दहावी च्या परिक्षेला बसला आहे. आपल्याला वह्यापुस्तकांचा खर्च झेपणार नाही म्हणून त्याने उन्हाळयाच्या सुट्टीत जंगलातली लाकडं तोडून, शिकार करून पैसे जमविले. त्याने आजपर्यंतचा शिक्षणाचा खर्च स्वबळावर केला व करतोय. त्याला पुढे शिकायचंय पण घरच्या नाजूक परिस्थितीमुळे त्याचे नुकतेच लग्न झाले. लग्नाचे आमंत्रण त्याने पत्रातून दिलं होतं. पण मी न जाता छोटीशी भेट पाठवली तर त्याने लगेच कळवलं की,
ी आम्हांला हव्या आहात
हातून भेट घेणार आहे.
हे वाचल्यावर माझे डोळे
ही मुले आपल्याला जीव

वर घरी गेले. मी व रिना
रेना अचानक रडू लागली.
ाई, मला पण तुमच्यासारखं
पण माझ्या सोबत शाळेत
ाळा बंद केली. घरचे माझं
. पण मला आताच लग्न
घरात जाऊन संसार उभा
ेत नाही." सोळा वर्षांच्या
घरच्यांना सांगून त्यांना
समजावल. खरच ितचा हा निश्चय कौतुकास्पद आहे. कारण तिथल्या स्त्रियांमध्ये शिक्षणाचा अभाव असल्याने स्वतःचा निर्णय घेता येत नाही. त्यांच्यामध्ये फक्त रिनाच मला वेगळी वाटते.

असंच एकदा दुपारी झाडाखाली सगळेजण गप्पा मारत बसलो होतो कुणाच्या बारशाची तयारी कितपत झालीय, कुणी आज किती लाकडं तोडली, शिकार मिळाली की नाही अशा नेहमीच्या गप्पा मारत असताना सहज शेतजमिनीचा

विषय निघाला. प्रत्येकाकडे पुरेशा प्रमाणात शेतजमीन आहे पण ताबा मात्र गावकऱ्यांनी घेतला. त्यांना एक कणसुद्धा धान्य काढून देत नाहीत. अशा आपल्या अडचणी सांगत असताना शिक्षणाचा विषय निघाला. अगदी कळवळून आपल्या व्यथा मोकळ्या मनाने सांगत होते. **"ताई, आम्ही नाही शिकलो पण आमच्या पोरांना शिकवून मोठं करणार. आमच्या सारखं दारूच्या भट्टया लावणं, शिकार करणं, जुगार खेळणं, असलं काही बाही नाय करायला लावणार ! आमाला बी याचा यीट आलाय! कवर कुत्र्यासारखं जीणं जगायचं? गावात चोरी झाली, की त्याचं खापर पोलिस आमच्या डोई फोडत्यात. बाया-पोरींची अब्रु लुटत्यात. कवर आमी सहन करायचं? आमाला माणूस म्हणून जगायचंय. तुमच्यासारखं .....''** हे त्यांचे बोल ऐकत असताना मन अगदी विषण्ण झाले होते.

एकीकडे समाधान वाटतं की, शिक्षणाचे महत्त्व यांना पटू लागलंय. पण दुसरीकडे समाजाचा रागही येऊ लागतो की आपणच आपल्या लोकांना खाली ठेवण्याचा प्रयत्न करतो. दुसऱ्याच्या पोळीवरचे तूप आपल्या पोळीवर कसे येईल याचा विचार करतो. ज्यांचा पगार रु. २०००/- आहे त्यांचा रु. ४०००/- होण्यासाठी संघर्ष होतो आणि त्यांच्या बऱ्याचशा मागण्या त्यांच्या पदरात ही पडतात. म्हणजे समाजात असे दृश्य निर्माण झाले, की ज्याचे पोट भरून जेवण झाले आहे, त्याला आम्ही श्रीखंडाची वाटी देत आहोत. परंतु जो उपाशी आहे, त्याला भाकरी तरी मिळाली आहे की नाही याचा आम्ही विचार करीत नाही. ज्यांच्या डोक्यावर छप्परही नाही, त्याला साध्या झोपडीचा निवारा कसा मिळेल, याचा आम्ही विचार करीत नाही.

पंधरा दिवस या लोकांत अगदी मिळून - मिसळून राहिल्याने प्रत्येकाला ही आपल्या घरातलीच ताई आहे असे वाटू लागले. प्रत्येकजण आमच्या खाण्यापिण्याची, तब्येतीची काळजी घेत होते. त्यांना आमचा व आम्हांला त्यांचा इतका लळा लागला की अजूनही त्यांची पत्रे येतात. शेवटच्या दिवशी निघताना सगळेजण गळयात पडून रडत होते. स्त्रिया - मुलं मुली व त्यांच्याबरोबर पुरुषही उभ्या-उभ्या आपल्या आसवांना मोकळ्या वाटा करून देत होते.

***With Best Compliments From :***

**M/S. BALDOTA SAMAL AND ASSOCIATES**

'Darshan' 1, B. J. Road,
Pune - 411 001. ☎ 623737/627844



# - धन्यता अभियान - खानापूर १९९५




**– श्री. कृ. दा. जोशी**

जनमंगल प्रतिष्ठान, पुणे तर्फे हवेली तालुक्यातील खानापूर या गावी सुरू केलेल्या 'ज्ञानदा' गुरूकुलाचा प्रमुख म्हणून नोव्हेंबर ९४ पासून दहा मुलांसह माझा मुक्काम खानापूरला गुरूकुलात असायचा. मार्च ९५ च्या मध्यास एके दिवशी 'स्व'- रूपवर्धिनीचे श्री.शिरीष पटवर्धन माझ्यासमोर येऊन उभे ठाकले. त्यांचे अचानक येण्याचे कारण जाणून घेण्यास मी उत्सुक होतो.

'स्व'रूपवर्धिनीच्या बालवर्धकांना श्रमसेवा शिबिराचा अनुभव घ्यायचा आहे. त्यासाठी गुरुकुलाच्या जागेचा वापर करता येईल का? अशी पहाणी करण्यासाठी ते आले होते. परिसर पाहून १ मे ते ७ मे १९९५ दरम्यान शिबिर घेणे नक्की झाले.

या शिबिरात विशेष असं काय साध्य करायचं होतं? कोणती श्रमसेवा करायची? त्याचा लाभ कोणाला द्यायचा? हे ठरवण्यासाठी परिसराचे सर्वेक्षण केले व असे ठरले की लहान मुलांना पेलवू शकेल आणि स्थानिक जनतेला उपयुक्त, पथदर्शक ठरेल असा "पाणी अडवा पाणी जिरवा" हा उपक्रम हाती घ्यावा खानापूर, खामगांव हमरस्त्याच्या बाजूने असलेल्या नाल्यात काही छोट बंधारे व शेततळी पूर्ण करावीत.

सोनदरा गुरूकुलातील ८३ जणांनीही या शिबिरात सहभाग घेतला. डोंगरदऱ्यातील एकांतात राष्ट्रभक्ती, समाजसेवा अन् व्यक्तिविकासाची शिकवण देणारे सोनदरा गुरूकुल, ३ ते १० वयोगटातील उपेक्षित, निराधार अशिक्षित बालकांना सक्षम सामाजिक कार्यकर्ते घडवण्यासाठी नुकतेच सुरू केलेले ज्ञानदा गुरूकुल व 'स्व'- रूपवर्धिनी यांचा त्रिवेणी संगम झाला. व खळाखळ वाहणाऱ्या नदीप्रमाणे नित्य, दैनंदिन, भरगच्च कार्यक्रमांच्या रूपात खानापूरचा परिसर खळाळून निघाला.

**श्रमसेवा –**

ज्ञानदा गुरूकुलाच्या पश्चिमेकडील डोंगराकडून पावसाचे पाणी प्रचंड वेगाने वहात खामंगाव रस्त्याच्या बाजूने असणाऱ्या नाल्यातून खानापूरच्या ओढ्यात मिळते. पाण्याबरोबर मातीही वाहून जाते म्हणून डोंगराच्या पायथ्यापासून दर १५-२० फुटावर एक मीटर उंचीचे छोटे बंधारे, छोट्या मुलांकडून बांधून घ्यायचे ठरले. **रोज सकाळी ३ ते ४ तास श्रमसेवा करून सात दिवसांत १५० मुलांनी २३ बांधारे व दोन शेततळी पूर्ण केली.** यात १२ वयोवृद्धांचा सहभाग होता. पद्मभूषण श्री. अण्णा हजारे, डॉ. मनोहर आपटे, किशनदेव महाजन, पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांचेही मार्गदर्शन व सहभाग लाभला.



**प्रबोधन -**

गुरूकुल संगमाचे सर्वाधिकारी होते सर्वात तरूण, सत्तर वर्षांचे श्री. भालचंद्र वझे. प्रेरणादायी थोरांची चरित्रे, इतिहास, रसायन, विज्ञान, निसर्गाचा अभ्यास इ. अनेक प्रेरणादायी विषय झाले.

**सांगता -**

७ मे रोजी शिबिराची सांगता झाली. सेंच्युरी एन्काचे कार्यकारी संचालक श्री. देव यांच्या उपस्थितीत मा. पुरूषोत्तमभाई श्रॉफ यांचे अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. दिनदयाळ शोध संस्थानचे श्री. यादवरावजी जोशी हे उपस्थित होते.

श्रमसेवेचा मुलांवर किती प्रभाव पडला याचे प्रत्यंतर प्रत्यक्ष १८ तारखेला अनुभवले. धुंवाधार पावसामुळे आलेल्या पाण्याचा लोंढा आम्ही बांधलेला एक बंधारा उध्वस्त करतो आहे हे गुरूकुलातील दोन मुलांच्या लक्षात येताच सर्व सोळा मुलं- ३ ते १० वयोगटातील - फावडी, टिकाव, पाट्या घेऊन भर पावसात चिंब भिजत, कोणाच्याही आज्ञेची वाट न पाहता बंधाऱ्याकडे धावत गेली आणि एका तासात हा बंधारा पुनः पूर्ण दुरूस्त केला. बांधाऱ्याच्या आतील भागात साचलेले पाणी व त्याच्या पल्याडच्या कोरडा भाग पाहून पाणी अडते कसे आणि मुरते कसे हे प्रत्यक्षपणे पाहिले. यापेक्षा शिबिराची सांगता आणखी कोणत्या चांगल्या मार्गाने होणार?

# असा एखादा 'मी' असावा !

श्री. जयंत कवठेकर

वर्षप्रतिपदेचा - नवीन वर्षाच्या प्रारंभाचा दिवस! वेळ सूर्योदयाची. ओंकारेश्वराचा सारा गाभारा तानपुऱ्याच्या धीरगंभीर स्वरांनी झंकारत होता. स्वरांच्या संगतीनं, ओंकार रूपानं, जणू साक्षात नादब्रह्म त्या गाभाऱ्यात साकार होत होतं. 'स्व'-रूपवर्धिनीचे सर्व कार्यकर्ते या ओंकार-उपासनेकरिता ओंकारेश्वराच्या मंदिरात एकत्रित झाले होते. वर्धिनीत अगदी प्रारंभापासून असलेला एक युवक अत्यंत उत्कट समरस भावानं उपासनेच्या मंत्रातील एकेक शब्द उच्चारत होता. आणि त्याच उत्कट समरस भावानं सर्वजण त्याच्या मागोमाग मंत्रोच्चारण करीत होते.

उपासनेत सहभागी झालेल्या साऱ्यांना स्वतःतल्या 'स्व' चं भान कधी गळून पडलं हेच समजत नव्हतं. ज्या संस्कारातून मी जात आलो तिथे असे आत्मविलोपाचे दुर्मिळ क्षण मी अनुभवले होते. आजचा हा दुर्मिळ अनुभव - योग त्याच दुर्मिळ कुळीतला होता. कधीही न विसरता येण्यासारखा! सतत जपून ठेवावा असं वाटण्यासारखा!

खरं तर मला एकट्यालाच नव्हे तर त्या उपासनेत सहभागी झालेल्या सर्वांनाच ' अरूपाचं रूप जाणवून देणारा, "स्व-" चा भाव त्या क्षणी पूर्ण नाहीसा करून टाकणारा' हा अनुभव ! आणि हेच 'मी 'स्व'-रूपवर्धिनीत का येतो? इथं येऊन मला काय मिळतं? माझ्यात कोणता बदल होतो?' याचं उत्तर आहे.

'स्व'रूपवर्धिनीत अशी 'उत्तरं' अत्यंत अनपेक्षितपणे पण अत्यंत सहजतेनं अन् पावलोपावली आपल्यासमोर उभी राहातात. . . गत वर्षीचा रक्षबंधनाचा दिवस मला आठवतोय. सकाळची नऊची वेळ. 'आजोळ प्रकल्पातील सर्व मुलं-मुली एकत्रित झाली होती. कमला-नेहरू रुग्णालयातील सर्व रुग्णांना रक्षा बांधण्याचा कार्यक्रम होता. दोन-अडीच तास कार्यक्रम चालला होता. त्यानंतर सर्वजण पुन्हा एकत्रित आले विसर्जनापूर्वी सर्वांना रक्षाबंधनाच्या वेळी आलेल्या अनुभवांचं लेखन करून आणण्याचं आवाहन केलं.

दुसऱ्या दिवशी एका मुलीनं आपल्या अनुभवाचं लेखन माझ्या समोर ठेवलं. ती लिहिते . . . .

'. . . काल कमला नेहरु रुग्णालयात मी गेले. राखी बांधता बांधता मी एका म्हाताऱ्या बाईच्या खाटेजवळ गेले. मी त्यांना 'स्व'-रूपवर्धिनीतून राखी बांधण्याकरिता आल्याचं सांगितलं. त्यांनी माझी सगळी चौकशी केली. वर्धिनीबद्दल विचारलं. आणि शेवटी राखी उशापाशी ठेवायला सांगितली. मी हट्ट धरला. आजींनी राखी माझ्याकडून बांधून घेतली पाहिजे. त्यांनी माझ्याकडे पाहिलं आणि जवळ बोलावलं. त्या म्हणाल्या, " पोरी, मी तुझ्याकडून नक्की राखी बांधून घेतली असती पण. . . ! काय करू गं ! माझे हे बघ दोन्ही हात भाजले आहेत.' आजींच्या दोन्ही हातांना बँडेज होतं. त्यांचे डोळे पाण्याने भरलेले होते. मला कळत नव्हतं की हे अश्रू आनंदाचे आहेत की दुःखाचे.'

ज्या संवेदनशीलतेनं या मुलीनं हे अनुभव निवेदन केलं होतं ते पाहिल्यावर मला जाणवलं की खरंच मी निमित्त मात्र आहे. मी तिला अनुभवापर्यंत नेण्याचं फक्त काम केलं. पण त्यापुढे तिच्या निरागस संवेदनशीलतेनं जी व्याकुळता टिपली होती तो केवळ तिच्या आणि तिच्याच 'स्व' चा आविष्कार होता. तिच्या नकळत तिनं समाजातल्या दुःखितांशी एकरूप होण्याचा एक आदर्शच माझ्यासमोर ठेवला होता.

हातचं काहीही राखून न ठेवता निखळ मायेनं दिलेल्या सादाला प्रतिसादही कसा अस्सल अन् निखळ असतो याचे असेच दोन प्रसंग मला आठवतात.

एक दिवशी दुपारी उपासनेनंतर माझं उद्‌बोधन सत्र झालं. मुलं आता आपापल्या वर्गात जाणार होती. तेवढ्यात मागे थोडी कुजबूज चाललेली लक्षात आली. गटप्रमुखाला मला काही सांगायचं आहे हे लक्षात आलं. मी त्याला उभं केलं. जवळ बोलावलं. हातात एक सुंदर चित्र घेऊन तो आला. मला वाटलं त्याला चित्र दाखवायचं आहे.

म्हणून मी ते कौतुकानं पाहिलं. ते खरोखरच अप्रतिम होतं. मी चित्राचं कौतुक केलं. चित्र कोणी काढलं याची चौकशी केली. चित्रकाराला समोर बोलवून शाबासकी दिली. . .

पण एवढ्यानं संपलं नाही. सगळे तसेच उभे. त्यांना अजून काहीतरी सांगायचं होतं. मग गटप्रमुख मला धाडस करून सांगायला लागला, ' सर आपल्या '---- 'ताईंचा आज वाढदिवस आहे. तो आम्ही आज साजरा करणार आहोत. त्यांना भेट देण्याकरिता यानं दोन तीन दिवसबसून हे चित्र काढलं आहे. आम्हाला वाढदिवस साजरा करायची परवानगी हवी आहे. ताईंचा वाढदिवस मुलांनी जोरात साजरा केला. विशेष म्हणजे ताईंच्याही लक्षात नव्हतं की आज आपला वाढदिवस आहे.

आणखी एका दुपारी मधल्या सुट्टीत तीन-चार जण माझ्याकडे आले. घरी जाण्यासाठी परवानगी मागू लागले. जास्त चौकशी करता त्यांना आजारी असलेल्या ताईंकडे जायचं होतं असं कळलं ताईंचा पत्ता विचारू लागली. रस्ते विचारू लागली. मनात एक शंका आली म्हणून विचारलं, "तुम्ही जाणार कसे?" आधी म्हणाले, 'सायकलनं'. मग म्हणाले 'बसनं'. शेवटी कळलं पायी जाणार आहेत. ताई जवळच के. इ. एम. मध्ये आजारी होत्या. पण तिथे त्यांना खूप जणांनी जाऊन त्रास देऊ नये म्हणून मुलांना काही सांगितलं नव्हतं. आता त्यांना ताई घरी आल्याचं कळलं होतं. त्यांना पत्ता सापडणार नाही. चुकतील. पुन्हा ताईंना नुकतंच घरी नेलेलं. म्हणून मी आढेवेढे घेत होतो. पण समोरच्यांचे डोळे भरलेले होते. त्या डोळ्यांत 'ताईं'वरचं प्रेम होतं आणि तिकडे जायला अडथळे आणणाऱ्या माझ्याबद्दल राग होता.

प्रेम, माया कशी लावायची असते याचा जिवंत प्रत्यय या दोन्ही ताईंनी आणून दिला होता आणि अशा जिवंत प्रेमाला तितकाच उत्स्फूर्त प्रतिसाद कसा देता येतो हे मुलांनी दाखवून दिलं होतं.

"ऐसी कळवळयाची जाती" खूप खूप दिवसांनी मला इथंच आणि फक्त इथंच गवसली. "करी लाभावीण प्रीती!" ची जीवंत अनुभूती आली आणि तिनं मला खरोखरच अंतर्मुख केलं.

अशीच एक संध्याकाळ. अंतर्मुख करणारी. ज्ञानप्रबोधिनीच्या सभागृहात मा. कृष्णराव पटवर्धनांचा ज्येष्ठ नागरिकसंघाच्या वतीने सत्कार झाला. मानपत्र प्रदानाचा सोहळा झाला. डॉ. हेडगेवार यांच्या आदर्श जीवनापासून प्रेरणा घेऊन, डॉ. आप्पासाहेब पेंडसे यांच्या सहभागी मार्गदर्शनानं समाजपरिवर्तनासाठी 'शिक्षण' हे माध्यम आपण कसं निवडलं याचं विवेचन मा. कृष्णरावांनी केलं. आणि खालील ओळींच्याद्वारे त्यांनी आपले मनोगत व्यक्त केलं.

**"भाट भेटतात ठायी ठायी**
**वाट दाखविणारा एखादाच**
**नक्राश्रू ढाळणारे अनेक**
**अश्रू पुसणारा एखादाच**
**प्राण घेणारे अनेक**
**जीव ओवाळणारा एखादाच**
**असा एखादा 'मी' असावा**
**पण 'मी' पणाचा गर्व नसावा ।**


समारंभ संपला, ओळी विसरल्यासारख्या झाल्या पण त्यातला भाव आणि ते व्यक्त करणारं मन कधी तरी विसरता येईल का? ☆ ☆ ☆

*With Best Compliments From :*

**M/S. METAFIN PROCESSOR**

Tophkhana, Shivajinagar,
Pune - 411 005



**रामकृष्ण शाखेच्या केदार हुपरीकर** या युवकाचा अमेरिकन कॉंक्रीट इंस्टिट्यूटच्या महाराष्ट्र शाखेतर्फे घेण्यात आलेल्या "कॉंक्रीट मिक्स् डिझाईन" या अखिल भारतीय पातळीवर झालेल्या स्पर्धेत **प्रथम क्रमांक** आला. यात तीन जणांच्या गटाने भाग घ्यायचा होता. ठरवून दिलेल्या ताकदीचे कॉंक्रीट कमीत कमी सिमेंट वापरून बनवायचे हा निकष. त्यासाठी लागणारे सिमेंट, वाळू, पाणी, खडी व इतर यांचे याने असे विशिष्ट प्रमाण शोधून काढले की हे शक्य झाले.

३०० Kg / mm2 या ताकदीसाठी लागणारे आवश्यक सिमेंट १३ पोती.
शोधलेले विशिष्ट प्रमाण वापरून लागणारे आवश्यक सिमेंट ४.७ पोती.
कमीत कमी सिमेंट वापरून तेवढ्याच ताकदीने टिकणारे कॉंक्रीट तयार करून त्याची चाचणी घेतली.हे प्रमाणबांध कामात वापरण्यास सिमेंटची व पर्यायाने पैशांची बचत. **अभिनंदन केदार!**

- **कु. संदीप मोरे व सचिन कांबळे - समर्थ शाखा** - वर्गात सर्व प्रथम .
- **श्री. शिरीष अडके** - आय. टी. आय. रेफ्रीजरेशन व एअर कंडिशनिंगच्या परीक्षेत सर्व प्रथम .
- **श्री. गिरीश अडके** - एम् एस्सी (गणित) विशेष योग्यतेसह उत्तीर्ण.
- **श्री. संजय शिंदे** - महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण व विक्रीकर अधिकारी म्हणून नियुक्ती.
- **दिलीप भांगरे** - एम. ए. प्रथमश्रेणीत उत्तीर्ण व बी. एड करीत आहे.
- **वृषसेन दाभोळकर** हा विद्यार्थी चित्रपटात बालकलाकार म्हणून चमकला.
- **रोहिणी वाखंडे व हेमांगी खेडकर** यांना शालेय स्पर्धेत नाट्य दिग्दर्शनाचे पारितोषिक.
- **श्रीमती पुष्पाताई नडे** यांना मा. भिमराव गस्ती यांच्या उत्थान ट्रस्टच्यावतीने सावित्रीबाई फुले पुरस्कार मिळाला.
- **सातवीच्या स्कॉलरशीपच्या परीक्षेला अखंडानंदशाखेतील पाच मुले बसली. पैकी चार उत्तीर्ण झाली व संदेश आंबेकर हा महाराष्ट्रात सतरावा आला.**
- **मा. कृ. ल. पटवर्धन यांना या वर्षीचा फाय फाऊंडेशनचा सन्माननीय पुरस्कार जाहीर झालेला आहे.**

# फिरती प्रयोगशाळा

विज्ञान हा आजच्या जगातला परवलीचा शब्द आहे. ज्या ज्या देशांनी, मानवी समाजगटांनी विज्ञानाची कास धरली, त्यांचा प्रगतीचा वेग विलक्षण आहे. आपल्या देशालाही आज विज्ञानाची साथ धरल्याशिवाय गती नाही व प्रगती नाही. खेडोपाडी पोचलेल्या शालेय शिक्षणात आज 'विज्ञान' आहे; परंतु त्यासाठी पुरेशी साधनं नाहीत, मार्गदर्शनासाठी तज्ज्ञ शिक्षक नाहीत. शहरातील उपेक्षित भागांमध्ये हीच स्थिती आहे. ही उणीव दूर करण्यासाठी फिरत्या सुसज्ज प्रयोगशाळेचा अभिनव प्रकल्प 'स्व'-रूपवर्धिनी व विज्ञानभारती, पुणे यांनी सुरू केला आहे.

प्रत्यक्ष निरीक्षणांतून, स्वहस्ते केलेल्या प्रयोगांतून शालेय अभ्यासक्रमातील विज्ञान उमजावे, छोट्या छोट्या शास्त्रीय तत्त्वांवर आधारित खेळातून विज्ञानाची मूलतत्त्वे साकार होताना विद्यार्थ्यांनी पाहावीत व त्याची दैनंदिन जीवनातील गरजांशी सांगड घालण्याचा प्रयत्न त्यांनी करावा यासाठी ही धडपड आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त वैज्ञानिक प्रतिभा जागी करण्याचे हे एक **'प्रयोग माध्यम'** आहे.

प्रयोग शिकवता शिकवता मुलांना देशभक्तीपर गोष्टी, गाणीशिकवावीत, दृक्‌श्राव्य माध्यमाच्या साहाय्याने संस्कारपूर्ण चित्रपट, लघुपट दाखवावेत व सामाजिक जाणीवेचा संस्कारही त्यांच्यात निर्माण व्हावा, असाही प्रयत्न आहे. चांगल्या कार्यक्रमांच्या साखळीतून सुजाण नागरिकांचे संघटन भावी काळात तेथे निर्माण व्हावे. असा मनोदय काम करणाऱ्या शिक्षक कार्यकर्त्यांचा आहे.

या कामासाठी तज्ज्ञ, अनुभवी शिक्षकांचा एक कृतिगट सज्ज आहे. साधनांची मर्यादा लक्षात घेऊन पुणे शहरातील उपेक्षित भागांतील शाळा व जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील काही शाळा यांच्यावर संस्थेने लक्ष केंद्रित केले आहे. एका दिवसात साधारणपणे पंचवीस विद्यार्थ्यांचे तीन गट प्रत्यक्ष सहभागी होऊ शकतील अशी यंत्रणा उभी करण्याचा प्रयत्न आहे. दोन टप्प्यांमध्ये योजना कार्यान्वित करण्याचा प्रयत्न असून त्यासाठी साधनांची व आर्थिक निधीची आवश्यकता आहे.

आतापर्यंत चार वेळा आपण ही फिरती प्रयोगशाळा घेऊन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलो आहोत.



सर्प हाताळताना बालशाखेतील मुले

**दिव्यत्वाची जेथे प्रचिती ।**
**तेथे कर माझे जुळती**

सौ. विद्याताई नातू ,साधं सोज्वळ व्यक्तिमत्त्व. नऊवार साडीतलं. हळूवार. रोज भगिनी निवेदिता शाखेच्या प्रार्थनेच्या वेळी झाडाखाली हमखास उभं असणारं त्यांचे ते आश्वासक अस्तित्व. मनाला धीर देणारं. १० वी च्या विद्यार्थिनींना हसत-खेळत कधी इंग्रजी शिकलो ते कळतही नसे. अशा ह्या साध्या राहणीत अनेकानेक उत्तम विचारांच्या उंचीत नेणाऱ्या विद्याताई नातू यांचे दि. ३० जून १९९५ रोजी हृदयविकाराने निधन झाले. आता सायंकाळच्या काळयारेघांमधले ते झाड एकाकी उदास वाटते. शाळेतल्या रिकाम्या वर्गासारखे. त्यांच्या पवित्र आत्म्यास सद्‌गती लाभो ही परमेश्वरचरणी प्रार्थना!

**Date : 22 | 7 | 95** **God Bless You** **Sunday**

अति प्रिय मॅडम,

तुम्हांला माझे (मेरी) हीचे अनेक प्रेमी विचारणे वि. वि.

मॅडम आपले लेटर मला केव्हाच मिळाले. वाचून मला खूप समाधान व आनंद वाटला. मॅडम परंतु बाहेर गावी गेल्यामुळे मला पत्र लिहिण्यास लेट झाला. ह्या बद्दल क्षमस्व. तरी मॅडम मला तुमच्या तिकडची आठवण खूप येते. बरे मॅडम आपण कशाकाय आहात? मराठे मॅडम, कलबाक मॅडम कशा काय आहेत? ह्या सर्वांना माझा प्रेमपूर्वक सलाम सांगणे. मॅडम विशेष म्हणजे मी नुकताच आपल्या येथे होमनर्सिंगचा कोर्स केला होता. परंतु आता पूर्ण नर्स झाले आहे. मॅडम सध्या मी कृपा नर्सिंग होम, थोलार हॉस्पिटलमध्यें काम करीत आहे. सध्या मला पगार १२०० रूपये पगार घेत आहे व नाईट पण करते. पूर्ण वार्डचि सांभाळत असते. पूर्ण जबाबदाऱ्या संभाळते. सर्व पेशंट, सर्व प्रकारचे मी हाताळत असते. तेव्हा मी माझ्या आयुष्यात इतकी यशस्वी होईल असे स्वप्न ही कधीच रचले नव्हते. परंतु देवाची कृपा व आपण दिलेले ज्ञान व आपली कृपा, आपली माया व प्रेम यावरून सर्व अनुभवले. देव आपणास अधिक ज्ञान सुबुद्धी देवो. मॅडम मी आपले सर्टिफिकेट सुद्धा दाखवले नव्हते परंतु माझे त्यांनी एक महिन्यातच काम पाहिले व लगेच स्थायी केले आहे. आता मी कायमचीच तेथे नोकरी करणार. फक्त मला डिलीव्हीरी करता येत नाही. तरी करण्यास डेरींग करते. विशेष सांगावयाचे म्हणजे मॅडम मी कमवण्यास लागले तेव्हा माझ्या सासऱ्याच्या डोळयातून आनंद आश्रु आले. परंतु मॅडम ते देवयोगाने मॅडम त्यांना देवाज्ञा झाली तरी मॅडम मी माझे दु:ख तुम्हांला कसे सागु. सध्या सर्व ठीक चालले आहे. मॅडम तुम्ही सर्व नगरला माझ्या घरी कधी येताय मी तर आपली खूप वाट पहाते. थोलार हॉस्पीटल खूप मोठे आहे.. ख्रिश्चन आहे. मॅडम अजून ट्रेनिंग चालू आहे का? सर्वांना माझा सलाम सांगा. आता काय लिहु. मॅडम आपण घरी येणार आपणास वेळ मिळाल्यास घरी येणे. घरी येण्याच्या आधी मला लेटर पाठवणे म्हणजे मी गाडीखर्च पाठवून देईल. अजुन आपले उपकार मानावे तितके थोडेच आहेत. तरी असेच वारंवार पत्र पाठवून समाधान करता या बद्दल आभारी. आपल्या बॅचच्या मुलींना काम लागले का नाही? माझे दोन्ही लेकरे सुखी व मिस्टर व घरातील सर्व काही बरे आहेत. माझी कोणत्याच प्रकारे काळजी करू नये. आपणच आपली स्वत:ची काळजी घेणे. शरीरप्रकृती सांभाळते.

आता जास्त काही नाही. देव आपणास आर्शिवाद देवो. दु:खी, संकटी अडीअडचणीत मदत करो. हीच अपेक्षा बाळगणारी आपलीच विद्यार्थिनी. लेटर उत्तर देणे, वाट पहाते.

**Mary A. Jadhav**

*With Best Compliments From :*

**M/S. LANDMARK CONSTRUCTIONS**

'Darshan', 1, B. J. Road,
Pune - 411 001. Phone 627844, 623737

## दैनंदिन प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**१) रामकृष्ण शाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
शाखाप्रमुख – **श्री. प्रसाद जमखिंडीकर**
शाखापालक – **श्री. शांताराम हायगुंडे**

**२) समर्थ रामदास शाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
शाखाप्रमुख – **श्री. आतिश वेळेकर**
शाखापालक – **श्री. प्रमोद बेहरे**

**३) विवेकानंद शाखा**
रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय,
पांडवनगर, वडारवाडी, पुणे १६
शाखाप्रमुख – **श्री. शिरीश अडके**
शाखापालक – **श्री. शं. रा. दाबके**

**४) अखंडानंद शाखा**
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय,
बिबवेवाडी, पुणे ३७.
शाखाप्रमुख – **श्री. सचिन चव्हाण**
शाखापालक – **श्री. राजाभाऊ लवळेकर**

**५) सुबोधानंद शाखा**
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत,
कर्वेनगर, पुण ५२.
शाखाप्रमुख – **श्री. निशिकांत वाईकर**
शाखापालक – **श्री. व. ना. दाते**

**६) भगिनी निवेदिता शाखा**
आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे ११.
शाखाप्रमुख – **कु. मंगला कुडलिंगार**
शाखापालक – **श्री. शिरीष पटवर्धन**

**७) 'आजोळ'**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
प्रमुख – **श्री. जयंत कवठेकर**
**संपर्क :**
सोम. ते शुक्र. सायं. १ ते ५

**८) शारदामणि महिला विभाग व बालवाडी 'पाकोळी'**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
प्रमुख – **श्रीमती पुष्पाताई नडे**

**९) वीर अभिमन्यू बालशाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११.
शाखा प्रमुख – **श्रीमती पुष्पाताई नडे**

(८ व ९) **संपर्क :**
सोम. ते शुक्र. स. १० ते १,
शनि. ९ ते १०.३०

**१०) कार्यालय**
**१) श्रीमती वासंतीताई यादव**
**२) श्री. रामकृष्ण रानडे,** व्यवस्थापक
**संपर्क :**
सोम. ते शनिवार स. ११ ते ५

**दैनंदिन शाखांसाठी संपर्क :**
सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्रौ. ८.३०
शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३०
रविवार स. ७.३० ते १०.००

**प्रधान शाखा पालक**
**श्री. दि. दा. जोशी**
जनता गृहरचना संस्था,
बिबवेवाडी, पुणे ३७.

# कार्यकारिणी व मा. सभासदांची यादी

## सन्माननीय सभासद

श्री. जयसिंगभाई मरिवाला

श्री. नानासाहेब पवार

श्री. अविनाश वारदेकर

श्री. एम. ए. वदूदखान

❀

## कार्यकारी समिती

अध्यक्ष

**श्री. पु. व श्रॉफ**

❀

उपाध्यक्ष

**श्री. अ. न. गोगावले**

❀

कार्याध्यक्ष

**श्री. कृ. ल. पटवर्धन**

❀

सहकार्याध्यक्ष

**श्री. व ना. दाते**

❀

सहकार्याध्यक्षा

**श्रीमती कुंतला मुजुमदार**

❀

कोषाध्यक्ष

**श्री. श्री. शं. सामळ**

❀

सचिव

**श्री. रा. प. देसाई**

❀

सहसचिव

**श्री. शिरीष रा. पटवर्धन**

## सभासद

श्री. प्रतापराव पवार

श्री. वा. दे. संचेती

श्री. कां. गि. शहा

श्री. कृ. गो. लवळेकर

प्रा. श्रीमती उषःप्रभा देसाई

श्री. उदय गुजर

श्री. पुखराजजी जैन

सौ. चंद्राताई दलाया

## संपर्क

**कार्याध्यक्ष :**

**श्री. कृ. ल. पटवर्धन**

४२८/२०, शिवाजीनगर,

पुणे – ४११ ०१६.

दूरध्वनी : ३५५८३५

## कार्यवाह

**श्री. रा. प. देसाई**

दूरध्वनी : ६६४३७५

## सहकार्याध्यक्षा

**श्रीमती कुंतला मुजुमदार**

दूरध्वनी : ३५३६०६

**'स्व'-रूपवर्धिनी**

२२/१, मंगळवार पेठ,

पारगे चौक,

पुणे – ४११ ०११

फोन : ६२१७०४